## काही क्षणचित्रे

प्राचार्य व प्राध्यापक वर्ग



प्राचार्यांच्या समवेत संपादक मंडळ



प्राचार्यांच्या समवेत कार्यालयीन सेवक वर्ग



श्री. विजयराव बाबूराव जाधव यांचा महिला महाविद्यालयास ७५ बेंचेस व चार लेक्चर स्टॅण्डस् - अंदाजे एक लाख रुपये देणगी दिल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर यांच्या हस्ते सत्कार.



## राष्ट्रीय सेवा योजना : विशेष शिबीर वडोली-भिकेश्वर



प्राचार्य डी. डी. थोरात शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना.



प्रकल्पाधिकारी प्रा. मारुफ मुजावर शिबिराचा समारोप करताना.

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' - कर्मवीर.

# रयत शिक्षण संस्थेचे, महिला महाविद्यालय, उंब्रज

फोन : ६४३३५

# त्रिवेणी

## १९९४ - ९५

### संपादक मंडळ

❖ अध्यक्ष : प्राचार्य डी. डी. थोरात

प्रमुख संपादक : ❖ प्रा. बी. पी. पाटील

विभागीय संपादक :

❖ प्रा. एल. पी. जाधव
❖ प्रा. एम्. जे. शिवदास
❖ प्रा. एस. डी. भोसले
❖ प्रा. एम्. एच. फाटक
❖ प्रा. एन. आर. सुर्यवंशी

चित्रण व मुद्रण : प्रिंट ओम ऑफसेट, २६९, ब/२ दौलतनगर सातारा. फोन : २१०४९, ३२०८
कॉम्प्युटराईज्ड टाईपसेटींग : टाईप इनोव्हेटर्स, १९५, सदाशिवपेठ, सातारा. फोन : २१७४२

रयत शिक्षण संस्थेचे,

# महिला महाविद्यालय, उंब्रज

## स्थानिक सल्लागार समिती

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | चेअरमन |
| २) | मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सभासद |
| ३) | माननीय दत्तात्रय श्रीपतराव जाधव | सभासद |
| ४) | माननीय शिवाजीराव शंकरराव कुरकुटे | सभासद |
| ५) | माननीय मारुती गणपती जाधव | सभासद |
| ६) | प्रा. बाळकृष्ण पांडुरंग पाटील (प्राध्यापक प्रतिनिधी) | सभासद |
| ७) | प्रा. नेताजी राजाराम सूर्यवंशी (प्राध्यापक प्रतिनिधी) | सभासद |
| ८) | प्रा. संपतराव शंकर मदने (प्राध्यापक प्रतिनिधी) | सभासद |
| ९) | श्री. आनंदराव तुकाराम इंगवले, (शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी) | सभासद |
| १०) | मा. प्राचार्य, महिला महाविद्यालय, उंब्रज | सेक्रेटरी |

□ □ □ □

# संपादकीय

प्रिय रसिक हो !

'त्रिवेणी' चा दुसरा अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

शिक्षणास वंचित झालेल्या आणि सामाजिक विषमतेच्या चिखलात रुतून बसलेल्या समाजास जागृत करण्याचा प्रयत्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केला. या समाजाकडे संख्याबळ होते पण विद्याबळ नव्हते. त्यांना शिक्षण देऊन समर्थ करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील त्यांच्या झोपडीपर्यंत चालत गेले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले आणि शैक्षणिक प्रसारासाठी त्यांची योग्य अशी मनोधारणा बनविली. बहुजन समाजाला जागृत करून त्यांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा नेली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचे महत्त्व खेड्यापाड्यामध्ये राहणाऱ्या समाजाला पटले आणि त्यांनी उदार हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याला मदत केली, त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्रियांनाही शिक्षण दिले पाहिजे अशी भूमिका कर्मवीर भाऊराव पाटील यांची होती. खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये व खेड्यांच्या जवळपास महाविद्यालये सुरु केल्यामुळे मुलांच्या बरोबर मुलींच्याही शिक्षणाची सोय झाली. स्त्रीशिक्षण विषयीची कर्मवीर भाऊराव पाटील यांची भूमिका डोळ्यापुढे ठेवून जनतेच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेने जून १९८९ पासून हे महिला महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे उंब्रज व उंब्रजच्या परिसरातील ग्रामीण व डोंगराळ भागातील मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय झाली. हे महाविद्यालय सुरू होऊन सहा वर्षे पूर्ण होत आहेत. या कालावधीत महाविद्यालयाने नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. विद्यार्थिनींची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे.

आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बौध्दिक क्षेत्रात चांगली प्रगती करावी म्हणून आम्ही सतत प्रयत्नशील असतो. त्यांचा सर्वांगीण व्यक्तिविकास व्हावा म्हणून शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यावर आम्ही उत्तम प्रकारचे संस्कार करीत असतो. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आमचा प्राध्यापक वर्ग सतत दक्ष असतो. आमच्या महाविद्यालयाचे विद्यापीठ परीक्षांचे निकालही भूषणास्पद आहेत. शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| एप्रिल १९९४ | बी.ए.भाग - १ | १००% |
| एप्रिल १९९४ | बी.ए.भाग - २ | १००% |
| एप्रिल १९९४ | बी.ए.भाग - ३ | १००% |

बी.ए.भाग-३ च्या वर्गात कु.संगीता प्रतापराव घोरपडे ही विद्यार्थिनी विशेष प्राविण्य (Distinc-
tion) मिळवून प्रथम आली. बी.ए.भाग-३ च्या वर्गात १९ विद्यार्थिनींना प्रथम श्रेणी मिळाली. बी.ए.भाग-
२ च्या वर्गात कु.उज्ज्वला वसंतराव पाखले ही विद्यार्थिनी प्रथम आली. या वर्गात सहा विद्यार्थिनींना

प्रथम श्रेणी मिळाली. बी.ए.भाग-१ च्या वर्गात कु.लता बाळकृष्ण खामकर ही विद्यार्थिनी प्रथम आली. या वर्गात सहा विद्यार्थिनींना प्रथम श्रेणी मिळाली. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मिळवलेल्या यशाबद्दल आम्हाला अभिमान वाटतो.

सांस्कृतिक मंडळ, वादविवाद मंडळ, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, राष्ट्रीय सेवा योजना, सहल विभाग, जिमखाना इत्यादी मंडळाच्यावतीने विविध कार्यक्रम व योजना राबविल्या जातात. क्रीडास्पर्धात विद्यार्थिनींनी सहभागी व्हावे म्हणून आमचा सतत प्रयत्न असतो.

समाजसेवेतून व्यक्तिविकास साधण्यासाठी 'राष्ट्रीय सेवा योजना' राबविली जाते. या योजनेत १०० विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत. या वर्षीचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे वडोली-भिकेश्वर ता.कराड या गावात घेण्यात आले. या शिबिरात ५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या शिबिरामध्ये रस्ते सफाई, गटार सफाई, समाजमंदिर परिसर स्वच्छता, प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता इत्यादी कामे केली. विद्यार्थिनींनी केलेले काम कौतुकास्पद आहे. याशिवाय विविध विषयावरील व्याख्याने आयोजित केली होती. या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये 'उत्कृष्ट स्वयंसेविका' म्हणून कु.वर्षा व्यंकटराव जाधव, कु.प्रतिमा शंकर शिंदे, कु.लता दिनकर माने, कु. सुनिता अरुण लोहार, कु.मनीषा वसंतराव देसाई या विद्यार्थिनींनी उत्तम काम केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्षभराच्या नियमित कार्यक्रमामध्ये वृक्षारोपण, गाजरगवत निर्मूलन, जनजागृती, मनोरंजनाचे कार्यक्रम, साक्षरता दिंडी, वृक्षदिंडी, लोकसंख्या शिक्षण, एडस् जनजागरण, व्यसनमुक्ती इत्यादी उपक्रम पार पाडले.

महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज असून त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील अनेक विषयावरील संदर्भग्रंथ, संशोधनपर ग्रंथ, तत्त्वज्ञानपर ग्रंथ, धार्मिक ग्रंथ आहेत. कथा, कादंबऱ्या, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, काव्य या ललित वाङ्मयाचा विभागही परिपूर्ण आहे. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिकेही आम्ही ग्रंथालयात मागवितो. यावर्षी पुस्तक पेढीची (Book-Bank) योजना आम्ही राबविली आहे. क्रमिक पुस्तकांचा पूर्ण संच पुस्तक पेढीतून दिला जातो. या योजनेचा बऱ्याच विद्यार्थिनींनी लाभ घेतला आहे. ग्रंथपाल श्री.एस.आर.गोडसे यांनी ही योजना अतिशय चांगल्याप्रकारे राबविली आहे. महाविद्यालयाच्या विकासातील एक महत्त्वाचा दुवा म्हणून आम्ही ग्रंथालयाकडे पहातो.

महाविद्यालयाला स्वतःची अशी इमारत नव्हती. त्यामुळे अनेक अडचणी येत होत्या. त्या दूर व्हाव्यात म्हणून गेल्या वर्षी कर्मवीर जयंतीच्या शुभमुहूर्तावर रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन प्राचार्य एन.डी.पाटील यांच्या शुभहस्ते नवीन इमारतीची कोनशिला बसविली आणि इमारतीच्या बांधकामाला सुरुवात केली. प्राध्यपक व कार्यालयीन सेवक यांच्या सहकार्याने प्राचार्य डी.डी.थोरात यांनी अतिशय परिश्रम घेऊन वर्ष-दीडवर्षामध्ये सहा खोल्यांची - सॅनिटरी ब्लॉकसह इमारत पूर्ण केली. मार्च/एप्रिल १९९५ मधील विद्यापीठाच्या परीक्षा या नवीन इमारतीतच झाल्या. या इमारतीला अंदाजे नऊ लाख रुपये खर्च आला. इमारत बांधकामासाठी मुख्यमंत्री फंडातूनही आर्थिक मदत मिळाली. इमारत बांधकामासाठी ग्रामस्थांचेही उत्तम सहकार्य लाभले. महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य व सेवकवर्ग यांचेही सहकार्य लाभले. अनेकांचे सहकार्य मिळवून सतत केलेल्या परिश्रमाचे फलीत म्हणजे महाविद्यालयाची नवीन इमारत होय.

आमच्या महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग अभ्यासू, अनुभवी व आपापल्या विषयात तज्ज्ञ आहे. आपल्या विषयाशिवाय विविध विषयांचे ज्ञान प्राध्यापकांनी आत्मसात करावे या उद्देशाने 'स्टाफ ॲकॅडमी' मार्फत शोध निबंध वाचले गेले. या वर्षी २५ विषयावरचे प्राध्यापकांनी शोध निबंध वाचले आणि त्यावर सखोल चर्चा केली. संस्थेत गरजेनुसार बदल्या होतात. या वर्षी आमच्या महाविद्यालयातून प्रा.जी.एन.ढाले, प्रा.आर.एस.म्हात्रे, प्रा.एम.एम. पाटील बदलून गेले. त्यांना हार्दिक शुभेच्छा! प्रा.ए.जे.पाटील, प्रा.एस.एस.मदने, प्रा.पी.डी. देशमुख बदलून आले. त्यांचे मनःपूर्वक स्वागत.

रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व स्थानिक सल्लगार समितीचे चेअरमन प्राचार्य एन.डी.पाटील, सचिव, सहसचिव, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य, म.गां.विद्यालयाचे प्राचार्य इत्यादींचे मार्गदर्शन व सहकार्य सतत लाभले आहे. याशिवाय सुरूवातीपासून उंब्रज व उंब्रजच्या परिसरातील ग्रामस्थांचे व हितचिंतकांचे सहकार्य लाभले आहे. या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळेच महाविद्यालयाने गौरवास्पद अशी प्रगती केली आहे.

प्राचार्य डी.डी. थोरात कर्तव्यदक्ष व उत्तम प्रशासक आहेत. ते इतिहासाचे गाढे अभ्यासक व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आहेत. इतिहासाची अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी त्यांनी अतिशय श्रम घेतले. त्यामुळे थोड्या कालावधीत सुबक व भक्कम अशी महाविद्यालयाची नवीन इमारत पूर्ण झाली. अचूक निर्णय व योग्य मार्गदर्शन हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य होय. महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रम व प्रकल्प त्यांच्या सुयोग्य मार्गदर्शनामुळे यशस्वी झाले.

'त्रिवेणी' मधील साहित्य म्हणजे विद्यार्थिनींच्या प्रतिभेचा कलात्मक अविष्कार होय. या अंकासाठी बरेच साहित्य आले. पृष्टसंख्येच्या मर्यादेमुळे आम्ही सर्व साहित्य या अंकात प्रकाशित करू शकत नाही. या अंकात आम्ही निवडक साहित्य प्रकाशित करीत आहोत. एक सुहृदय वाचक म्हणून आपण त्याचा रसास्वाद घ्यावा.

'त्रिवेणी'च्या संपादन व संयोजनासाठी अनेकांचे सहकार्य लाभले आहे. प्राचार्य, प्राध्यापक व कार्यालयीन सेवक यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. 'त्रिवेणी'चा अंक निटनेटका, सुबक व आकर्षक करण्याचे काम श्री.संदेश शहा, सातारा व त्यांचे सहकारी यांनी केले. या सर्वांचे मनापासून आभार.

'त्रिवेणी'चा अंक निटनेटक्या स्वरुपात सादर करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. तो आपण गोड मानून घ्यावा अशी अपेक्षा आहे.

**प्रा.बी.पी.पाटील**
प्रमुख संपादक.

❑ ❑ ❑ ❑

## आमचा सेवक वर्ग

❖ प्राध्यापक वर्ग –

❖ इतिहास –
१) प्राचार्य डी.डी. थोरात
२) प्रा. एन. आर. सूर्यवंशी
३) प्रा. ए. जे. पाटील

❖ मराठी –
१) प्रा. बी. पी.पाटील
२) प्रा. एस. डी. भासले

❖ हिंदी –
१) प्रा. एम. एस. मुजावर
२) प्रा. एम. जे. शिवदास

❖ समाजशास्त्र –
१) प्रा. आर. एस. यादव
२) प्रा. सौ. एस. आर. माने

❖ इंग्रजी –
१) प्रा. एल. पी. जाधव

❖ अर्थशास्त्र –
१) प्रा. एस. एस. मदने

❖ भूगोल –
१) प्रा. एस. ए. खाडे

❖ मानसशास्त्र –
१) प्रा. पी. डी. देशमुख

❖ लोकप्रशासन –
१) प्रा. सी. डी. पाटील

❖ शारीरिक शिक्षण –
१) प्रा. एम. एच. फाटक

❖ कार्यालयीन सेवक वर्ग –
१) श्री. एस. आर. गोडसे - ग्रंथपाल
२) श्री. ए. टी. इंगवले - ऑफिस सुपरिटेंडेंट
३) श्री. व्ही. बी. थेटे - सिनि. क्लार्क
४) श्री. एच. एस. यादव - ज्युनि. क्लार्क

❖ शिपाई –
१) श्री. आर. बी. कांबळे
२) श्री. के. के. निकम
३) श्री. ए. एस. कांबळे
४) श्री. सी. आर. खटावकर
५) श्री. व्ही. एस. कदम


**त्रिवेणी वार्षिक अंक दि. प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्सअॅक्ट नियम ८, फॉर्म ४ प्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | महिला महाविद्यालय, उंब्रज |
| २) | प्रकाशन काळ | वार्षिक |
| ३) | प्रकाशकाचे नाव | प्राचार्य डी. डी. थोरात |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय |
| | पत्ता | महिला महाविद्यालय, उंब्रज, जि. सातारा. |
| ४) | संपादक | प्रा. बी. पी. पाटील |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय |
| | पत्ता | महिला महाविद्यालय उंब्रज, जि. सातारा. |
| ५) | मुद्रकाचे नांव | संदेश शहा, प्रिंट ओम ऑफसेट, |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय |
| | पत्ता | २६९/ब, दौलत नगर, सातारा. फोन : २१०४९. |
| ६) | मालकी | महिला महाविद्यालय उंब्रज, जि. सातारा. |

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


आमची स्फूर्ती



मा. शरदरावजी पवार
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

आमची प्रेरणा



प्राचार्य डी. डी. थोरात

॥ स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ॥ – पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

## त्रिवेणी १९९४ - ९५



आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने ।
शब्दचीच शस्त्रे येत्न करू ॥
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्दे वाटू धन जनलोका ॥
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव ।
शब्देचि गौरव पूजा करू ॥

– संत तुकाराम

# मराठी विभाग

विभागीय संपादक – प्रा. शिवाजीराव डी. भोसले

# मराठी विभाग अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| अ.नं. | नाव | | लेखक | पा.नं. |
|---|---|---|---|---|
| १) | कर्मयोगी स्वामी विवेकानंद | - | कु. योगिता पाटील (बी.ए.-१) | ५ |
| २) | मी क्वचितेच झाले तर! | - | कु. अर्चना कुलकर्णी (बी.ए.-१) | ७ |
| ३) | वेट करार | - | कु. उज्वला पाखले (बी.ए.-२) | ९ |
| ४) | साक्षरता स्त्रीयांसाठी समानतेचे तत्व | - | कु. जयश्री थोरात (बी.ए.-२) | १२ |
| ५) | प्लेग ! प्लेग !! प्लेग !!! | - | कु. निलम साळुंखे (बी.ए.-३) | १३ |
| ६) | समाज व लोकसंख्या शिक्षण | - | कु. राजश्री बारटक्के (बी.ए-३) | १६ |
| ७) | लक्ष्मीबाई पाटील - त्यागी व्यक्तिमत्व | - | कु. स्वाती भोसले (बी.ए.-१) | १८ |
| ८) | एक पावसाळी संध्याकाळ | - | कु. उषा गायकवाड (बी.ए.१) | २० |
| ९) | लोकशाही आणि लोक शिक्षण | - | कु. मंजुषा पाटील (बी.ए.१) | २२ |
| १०) | वृक्षवल्ली आम्हा सोयरी | - | कु. शकुंतला सुतार (बी.ए.-१) | २३ |
| ११) | आजची स्त्री | - | कु. योगिता निकम (बी.ए.-१) | २४ |


## पद्य विभाग


| अ.नं. | नाव | | लेखक | पा.नं. |
|---|---|---|---|---|
| १) | जगण्याची प्रतिज्ञा | - | कु. स्मिता शेटे (बी.ए.-१) | ६ |
| २) | जीवनातील आशा | - | कु. सीमा चव्हाण (बी.ए.-२) | ११ |
| ३) | पैसे पैसे पैसा | - | कु. हौसाबाई घोरपडे (बी.ए.-३) | १५ |
| ४) | निरपेक्ष मैत्री | - | कु. योजना पाटील | १५ |
| ५) | तु का उदास आहेस ? | - | कु. शारदा जाधव (बी.ए.-३) | १५ |
| ६) | राखी | - | कु. प्रतिभा शिंदे (बी.ए.-१) | १७ |
| ७) | जगाची रीत | - | कु. किशोरी घाडगे (बी.ए.-१) | १७ |
| ८) | हुंडा | - | कु. जयश्री थोरात (बी.ए.-१) | १७ |
| ९) | का ? | - | कु. योगिता दगडोळे (बी.ए.-३) | १९ |
| १०) | ओळखा पाहू माझे नाव | - | कु. रंजना पुत्तेवांकर (बी.ए.-१) | १९ |
| ११) | विरह | - | कु. मनिषा देसाई (बी.ए.-२) | २१ |
| १२) | त्रिवेणी | - | कु. मंदाकिनी मदने (बी.ए.-३) | २१ |
| १३) | आत्मविश्वास | - | कु. राजश्री माने (बी.ए-१) | २१ |
| १४) | शुभेच्छा ! | - | कु. संध्या पाटील (बी.ए.-१) | २५ |
| १५) | जाणशिल का ? | - | कु. योगिता पाटील (बी.ए.-१) | २५ |
| १६) | जीवन | - | कु. चंद्रभागा खरात (बी.ए.-१) | २५ |
| १७) | स्वप्नांध | - | कु. अर्चना कुलकर्णी (बी.ए.-१) | २५ |
| १८) | पाखरा | - | कु. शुभांगी जाधव (बी.ए.-१) | २६ |
| १९) | पाहिजेत | - | कु. गौरी मोकाशी (बी.ए.-१) | २६ |
| २०) | रस्ते | - | कु. शकुंतला सुतार (बी.ए.-१) | २६ |
| २१) | प्रेमाखातर | - | कु. सुनिता माने (बी.ए.-१) | २६ |
| २२) | हुंडा | - | कु. वर्षा जाधव (बी.ए.१) | २७ |
| २३) | माझे बाबा | - | कु. चंद्रभागा खरात (बी.ए.-१) | २७ |
| २४) | साक्षरता गीत | - | कु. उषा गायकवाड (बी.ए.-२) | २७ |




# कर्मयोगी स्वामी विवेकानंद


कु. योगिता पाटील (बी.ए. भाग-१)


सर्वच देशात अशी काही पुरुष रत्ने निपजत असतात की, ज्यांच्यामुळे पृथ्वीचे 'वसुंधरा' नामाभिधान सार्थ होत असते. ते कर्मासाठीच कर्म आचरत असतात. नाव लौकिकाची त्यांना तमा नसते किंवा स्वर्गाला जाण्याची पर्वा नसते. ते कर्म करीत असतात. त्यापैकी एक स्वामी विवेकानंद होत. काही लोक असतात की जे याहीपेक्षा उदात्त हेतूने गरीबावर उपकार नि मनुष्य जातीला सहाय्य करण्याची वृत्तदीक्षा घेऊन कार्यप्रवृत्त होतात. अमुक एक कार्य सत्कार्य आहे आणि सत्कार्यावर त्याची श्रध्दा, प्रीति असते. म्हणूनच ते त्या सत्कार्याचे अनुष्ठान करीत असतात.

स्वामीजी म्हणतात -"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन, कर्माचाच आम्हाला अधिकार, फलावर आमचा कदापि नाही. फल काय व्हायचे ते त्याच्याशी कसलाच संपर्क ठेवू नका. कुणालाही सहाय्य करतांना त्या व्यक्ती चा मनोभाव तुमच्या विषयी कसा असावा इत्यादी संबधीच्या विचारांना मनात तिळमात्र थारा देवू नका. एखाद्या महान अथवा शुभ कर्माचे अनुष्ठान करण्याचा तुमचा मानस असेल तर फळाफळाच्या चिंतेने आपला मेंदू अजिबात शिणवू नका. कर्मयोगी बनण्यासाठी आपल्या ठायी प्रबळ कर्मशिलता आवश्यक आहे. त्यासाठी आपण सदैव कर्मरत असावयास हवे".

विवेकानंदजी पुरुषाबद्दल बोलत असताना म्हणतात, "आदर्श पुरुष तोच की जो अत्यंत गंभीर आणि स्तब्धतेमध्ये पराकाष्ठेचा कर्मरत असतो आणि प्रखर कर्मशिलतेमध्ये ज्याला मरुभूमीच्या निस्तब्धतेची प्रचिती येत असते त्यालाच संयमाचे रहस्य कळले आहे. आत्मसंयम साधला आहे. असे म्हणता येईल गजबजल्या नगरीतील अत्यंत वर्दळीच्या रस्त्याने जाताना देखील त्याच्या चित्ताची शांती यत्किंचितही ढळत नाही. एखादा निशब्द निर्मनुष्य गुहेत निवारण करीत असल्याप्रमाणेच त्याचे चित्त शांत राहते आणि तथापि तेव्हाही तो कर्मात कमालीचा गढुन गेलेला असतो. हाच कर्मयोगाचा आदर्श होय."

आमचे मुख्य कर्तव्य ते हेच की स्वतःची घृणा न करणे, उन्नत होवून गेल्यास आधी स्वतःवरच विश्वास आवश्यक आहे. स्वतःवरच ज्याचा विश्वास नाही त्याचा ईश्वरावर विश्वास कसला बसणार! सारांश, कर्तव्य आणि सदाचार ही आपल्या भेदानुसार भिन्न भिन्न असतात ह्या सिध्दांताचा स्वीकार केल्याशिवाय आपल्याला काहींच गत्यंतर नाही. अन्यायाला प्रतिकार केला म्हणजे जात्याच सदोष असे एखादे कृत्य आपल्या हातून घडले अशातला मुळीच भाग नाही. अन्यायाला प्रतिकार करणे नेहमी दोषावरच असते असे नाही. उलट एखाद्या विशीष्ट अवस्थेत प्रतिकार करणे माणसाचे कर्तव्यकर्म ठरु शकेल. अप्रतिकाराच्या त्या सर्वोच्च आदर्शाप्रत पोहचण्यापूर्वी प्रतिकार करणेच त्याचे कर्तव्य होय.

स्वामीजी पुढे म्हणतात, "गृही व्यक्तीने पत्नीला चुकूनही कठोर शब्दाच्या आघातांनी दुखवून नये. तिचा सर्वदा मातृवत प्रतिपाल करावा. आणि ती जर साध्वी व पतीव्रता असेल तर कष्टविपत्तीचे डोंगरही कोसळले तरीदेखिल तीला अतंर देता कामा नये. जाणत्याने परस्त्रीला कलुषित चित्ताने स्पर्श करु नये. असे केल्याने, तो

नरकास जातो; ज्ञानी व्यक्तीने परस्त्रीसहीत निर्जनीशयन वा एकांतवास करू नये. स्त्रीयां - समोरअनुचित भाषा वापरू नये, मी यँव केले, तँव केले, म्हणून फाजील फुशारकी मिरवु नये. धन, वस्त्र, प्रेम, श्रध्दा नि अमृतमय मधुर शब्दांनी स्त्रीला नेहमी संतुष्ट ठेवले पाहीजे. तिला अप्रिय वाटेल असे कोणतेच आचरण करू नये.

''शूर: शभौ विनित: स्थात बांधवे गुरु सानिधौ: '' म्हणजे गृहस्थाने आपल्या शत्रूशी वागताना मर्दपणाचा अवलंब केला पाहीजे गुरुशी आणि मित्राशी विनीत भावाने वागले पाहिजे. कर्माचे रहस्य सांगताना ते म्हणतात भगवद्‌गीतेचे मुळ सुत्रच आहे. निरंतर कर्म करा पण त्यात आसक्त मात्र होवू नका. 'संस्कार' शब्दाचा अर्थ, मनाचा स्वाभाविक कल अथवा प्रवृत्ती असा करता येईल. मानवी मनाला एखाद्या सरोवराची उपमा दिल्यास असे म्हणता येईल. मनामध्ये उठणारा प्रत्येक तरंग विरून जाताना पूर्णपणे नाहिसा होत नसतो तर तो चित्तावर आपले एक चिन्ह आणि त्याच बरोबर तो तरंग पुन्हा उदय पावण्याची शक्यता मागे ठेवून जात असतो. ते चिन्ह आणि ती त्या तरंगाची पुन्हा उत्पन्न होण्याची शक्यता ह्या दोघांना मिळूनच संस्कार म्हणतात''.

''परोपकार, पुण्याय, पापाय, परपी -डनन'' कुणाला दु:ख देवू नका, दुसऱ्यावर उपकार करणे सत्कर्म, कर्तव्य होय. दुसऱ्याला पीडा देणे हे असत्कर्म, अकर्तव्य होय. शरीराच्या रोम-रोमी कृतीशिलता भरलेली आहे. असे असुनही चेहरा म्हणाल तर नितळ नभासारखा पूर्ण शांत आणि प्रसन्नता शरीर, मन आणि आत्मा प्रभूच्या पावन श्रीचरणी केंद्रीत करून कोणत्याही परिस्थितीत शांत आणि दृढ राहणे हीच गीतेतील मध्यवर्ती कल्पना आहे.''

''कर्मव्यकर्मय: पश्यत अकर्मणिच कर्मय: स बुध्दिमान्मनुष्येषु सयुक्त:कृत्स्नकर्मकृत'' जो कर्म करीत असतानाहि मन शांत ठेवतो आणि बाह्यत: काही कर्म करीत नसतांही ब्रम्हचिंतनाच्या रूपाने ज्याच्या चित्तात कृतिशिलतेचा प्रवाह सतत वाहत असतो तोच खरा बुध्दिमान मनुष्य होय.

चैतन्यांच्या उपदेशापैकी कोणते योग्य आहे किंवा कोणते अंगीकारावे असे सांगताना स्वामीजी म्हणतात,''ज्ञानयुक्त भक्तीने ईश्वराची उपासना करा भक्ती बरोबरच सदसद विवेक बुध्दीला कार्य करू द्या. तसेच चैतन्याचे विशाल हृदय भूतमात्रांविषयी त्याच्या ठायी असलेली प्रेमभावना व दयाबुध्दी, त्यांच्या हृदयात वास करीत असलेली ईश्वर विषयीची ज्वलंत भक्ती, या सगळ्या गोष्टीचा तुम्ही अंगीकार करावा, आणि सर्वसंग परित्यागाची जी भावना त्याच्या ठिकाणी होती तीला तुम्ही आपल्या जीवनाचा आदर्श मानावा.

भयावस्य अग्नि: तपपिभयातपति सूर्य: ।
भयात इंद्रश्च वायुश्च मृत्यूधवति पंचम: ॥

त्यांच्यात आशेने वायु वहात असतो. सूर्यप्रकाशात असतो, पृथ्वी अस्तित्वात असते आणि मृत्यू पृथ्वीतलावर वावरत असतो. तोच सर्व आहे. आपण त्याची केवळ उपासना करू शकतो. इतकेच कर्माच्या समस्त फलांचा त्याग करा. सत्कर्मासाठीच सत्कर्म आचरा तेव्हाच कुठे संपूर्ण अनासक्ती लाभेल मग समस्त हृदयग्रंथी छिन्न होवुन जातील आणि आपल्याला पूर्ण मुक्ती प्राप्त होईल. ही मुक्तीच वस्तुत: कर्मयोगाचे ध्येय आहे आणि हेच कर्माचे रहस्य आहे.

❖ ❖ ❖ ❖

## जावयाची प्रतिज्ञा

सासरवाडी माझा देश आहे.
सासऱ्यासारखे सगेसोयरे माझे बांधव आहेत.
माझ्या बायकोवर माझे प्रेम आहे.

तिच्या घरातील विविधतेने नटलेल्या वस्तूवर माझा डोळा आहे. तिच्या बापाचा जावाई बनण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी, माझे सासु सासरे यांचा मान राखीन आणि प्रत्येकाशी स्वार्थाने वागेन. माझी बायको व मेहुणी यातच माझे सौख्य सामावलेले आहे. जय सासुरवाडी.

कु. स्मिता शेटे
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖





# मी कवयित्री झाले तर !

कु. अर्चना कुलकर्णी (बी.ए. भाग-१)

'रंगात रंगूया रंग रंग खेळुया, रंगाचं गाऊया गाणं
गाणं ग, रंगाच गाऊया गाणं ॥

असे म्हणत फेर धरणाऱ्या मुलींना काव्याची स्फुर्ती मिळते. त्यांच्या झिम्यातुन बालीश खेळातून त्यांना कोणी बर शिकवीलं गुणगुणायला? आईनं की ताईनं? छे! छे!! कोणतीही प्रतिमा, व्यक्तीची असो वा या वरील गाणं गुणगुणाऱ्या छकुलीची असो ती त्याला मिळालेलं वरदानचं! मग एवढच की, त्यांना कोणीतरी आधार द्यावा लागतो. उत्तेजन द्यावे लागते. त्या व्यक्तीस प्रोत्साहन मिळालं, त्यांच्या या गुणांचं कौतुक केलं तर व्यक्ती पुढे जाऊन कवी किंवा कवयित्री बनू शकते.

कविता तयार होण्यासाठी प्रतिमा, कल्पना, रसिकता, व अभिरूचीची आवश्यकता असते

'खराच वेडा खरा भिकारी परंतु मोठा गुणी, कवी हा जगताचा धनी'

कवीला वेडं ठरवल जातं, त्याची गणना पण कोणाला हे माहित नसतं की हाच या सामान्य गोष्टीतुन असामान्याची जाणीव देत असतो. सर्वच गोष्टीचा सारासार विचार करून कवी नारायण सुर्वे म्हणतात-, ''आम्ही नसतो तर हे सूर्य, चंद्र, तारे बिचारे फिक्के फिक्के असते. बापहो! तुमच्या व्यथांना शब्दात अमर कोणी केले असते.''

यावरून मी म्हटलं काहीतरी लिहावं, लिहावं म्हणजे नुसतं लिहीनं नव्हे-तर ते शब्दात गुंफावं. पण वेडीच होते मी असं लिहायंच म्हणून लिहील जातं होय? ते तर सुचावं लागतं अगदी त्यात हरवून जाऊन. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

''वाचे बरवे कवित्वाकवित्व बरवे रसिकत्वा रसिकत्व बरवे परतत्वा स्पर्शु जैसा ॥

पण माझी प्रतिमा तर जागृत झाली, तर मी खरोखरच सत्तेचे गीत गाईन. नको तितका प्रवास करीन. नवीन गोष्टींची जाणीव करून घेईन. एवढच काय कोणी जर मला सहाय्य केले नाही तर परमेश्वराशी सुसंवाद साधेन आणि माझ्या कल्पनांची ज्योत सतत तेवीत ठेवीन.

'रंगलो रंगात साऱ्या रंग माझा वेगळा गुंतलो गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा'

एखादं काव्य म्हणजे उत्कट भावनांचा तीव्र उद्रेक होय. मी माझ्या काव्यातुन अन्यायाविरूद्ध वाचा फोडीन की जे अजुनही अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यांच्या बंधनात अडकलेले आहेत. त्यांच्या मुक्तीसाठी माझ्या कवितेतून स्फुर्ति देईन. ज्याप्रमाणे सुरेश भट यांनी आपल्या कवितेतुन गायिले आहे.

'उष:काल होता होता काळरात्र झाली । अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली ।'

आज इतिहास काळाला लोक विसरत चालले आहेत. पै-पैचे, घराचे, धोंडे - धणाचे गौरव गाथे मी माझ्या कवितेतून सादर करीन. थोरामोठ्यांचे विचार लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न करीन. त्यासाठी माझ्या मातृभूमिला गुलाम म्हणून ताब्यात ठेवणाऱ्या त्या निर्दयांच्या विरुद्ध कविता करीन. त्यांनी जे जे भारतावर अन्याय केले आहेत. त्यांच्या या अन्यायाविरुद्ध वाचा फोडणारे शब्द माझ्या कवितेत असतील त्यांना न्याय मिळवून देणाऱ्या या महापुरुषांचे गीत गाईन माझ्या कवितेतून-

गुलामात अडकलेल्या देशाला
स्वातंत्र्य दिले कोणी?
बेधुंद, बेधुंद झालेल्या समाजाला
साद दिली कोणी ?
त्या वीरांनी, त्या महापुरुषांनी
त्या वीरांचे, त्या महापुरुषांचे
स्मरण करते, वंदन करते

[illegible] माझ्या कवितेत असेल [illegible], [illegible] गीत गाईन.

'प्रेम [illegible]
[illegible]?'

मी [illegible] संस्कार व संस्कृती [illegible] भारतातील संस्कृतीचे दर्शन [illegible] संस्कृतीला [illegible] [illegible] संत एकनाथ, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, रामदास स्वामी, [illegible] इ.

'जे का रंजले, गांजले,
त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा,
देव तेथेचि जाणावा ॥'

[illegible] आपल्या देशात गुलाम -गिरीतून मुक्त [illegible] स्वतंत्र हिंदुस्थान

धर्मविषयात सर्वात प्रथम कोणी पुरस्कार दिलता असेल? तर तो शिवाजी महाराजांनी. त्यांनीच या हिंदवी [illegible] प्रत्येकाला [illegible] अस्तित्वाची [illegible] [illegible] समर्थांनी म्हटलेच आहे-

"शिवरायांचे आठवावे रुप।
शिवरायांचा आठवावा प्रताप।
शिवरायांचा आठवावा आधार भूमंडळी ॥"

[illegible] प्रतीक आहेत [illegible] माझ्या 'मी [illegible]' [illegible] [illegible] कोणत्या पुरस्काराची अपेक्षा करणार नाही, [illegible]

[illegible] 'मिळत [illegible]' [illegible] [illegible] तुकाराम महाराज म्हणतातच ना-

'वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे।'

हे सर्व मी माझ्या कवितेतून पटवून देईन व मार्गदर्शन करीन, त्यामुळे आपला देश 'सुजलाम् सुफलाम्' राहील. [illegible] कुसुमाग्रजांनी म्हटलेच आहे-

"प्रिय हा भारत देश
अमुचा प्रिय हा भारत देश"

[illegible] माझ्या कवितेत असेल [illegible] [illegible] प्रयत्न करीन. [illegible] माझ्या कवितेला [illegible] [illegible] अपेक्षा करणार नाही. [illegible] मी [illegible] कविताची [illegible]!

॥ ॥ ॥ ॥





# गॅट करार (डंकेल प्रस्ताव)

कु. उज्वला [illegible] (बी.ए. भाग-३)

[illegible]

गॅटची स्थापना व कार्य :-

[illegible]

## GATT :- General Agreement on Tariffs and trade

[illegible] १९४८ [illegible]

समावेश नसावयाचा. परंतु विशेष बाब ही होती की, मुक्त व्यापार संघ (Customsunian) सामुहिक बाजार प्रादेशिक व्यापार, संघातील राष्ट्रांना 'गॅट' च्या कार्यक्षेत्रातून वगळले होते. प्रत्यक्षात या सर्व समुहांचे कार्य 'गॅट' च्या कार्याला छेद देणारे होते.

गॅटच्या समुहामध्ये अमेरिका हे मुख्य राष्ट्र आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकेने व्यापारात वृध्दी व्हावी म्हणून व्यापार धोरणात वेळोवेळी योग्य बदल करून व्यापार खुला करण्यास हातभार लावला अनेक औद्योगिक वस्तुंवरील प्रशुल्क 'गॅट' च्या अनेक चर्चा फेऱ्यातून अमेरिकेने जवळपास ५०% कमी केले. पुढे जपानला टोकिओ फेरीतून हेच करावयास लावले. याचा फायदा अनेक विकसनशील राष्ट्रांना झाला. पुढे याचा विपरित परिणाम अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदावर व व्यापारावर झाला. त्याची आयात निर्याती पेक्षा जास्त होवून व्यापार तुट वाढली.

१९८६ सालापासून अमेरिकेतील उरूग्वे देशामध्ये बोलण्याची आठवी फेरी सुरु झाली. पाच वर्षात ही बोलणी संपतील अशी अपेक्षा होती. परंतु अद्याप ती चालूच आहेत. १९८६ नंतर अमेरिकेच्या व्यापारामध्ये व धोरणामध्ये फार मोठा बदल झाला. त्याचप्रमाणे गॅट मार्फत आग्रह घटण्यास सुरुवात केली की, युरोप व जपान सारख्या देशांनी त्यांच्या कृषी क्षेत्रातील संशोधनाची फार मोठ्या प्रमाणावर इतर देशात चोरी होवू लागली म्हणून त्यांना पेटंट लागू करावे व संरक्षण करावे. यंत्रनिमिती मालाशिवाय इतर बाबी 'गॅट' च्या बोलणी फेऱ्यात यावी याचासुध्दा अमेरिकेने आग्रह धरला याचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्याकरिता गॅटचे महासंचालक, ''आर्थर डंकेल'' यांच्या अध्यक्ष-तेखाली १९८९ मध्ये एक समिती स्थापन केली गेली. समितीने मांडलेल्या प्रस्तावास 'डंकेल प्रस्ताव' असे म्हटले जाते.

'डंकेल प्रस्ताव' हा गॅटच्या १०८ सहयोगी राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी केलेल्या चर्चेच्या आधारावर तयार करण्यात आला. प्रस्ताव सर्व राष्ट्रांना देण्यात आला व सांगण्यात आले की, हा प्रस्ताव जसाच्या तसा मान्य करावा अथवा पूर्णपणे अमान्य करावा. विशिष्ठ तारखे पर्यंत जी राष्ट्रे त्यावर सह्या करतील तीच फक्त 'गॅट' शी बांधली जातील सहीन केलेल्या राष्ट्रांना नंतर सहयोगी राष्ट्राबरोबर व्यापार विषयक बोलणी करण्याचे कोणतेही स्वातंत्र्य राहणार नाही. डंकेल प्रस्तावात प्रामुख्याने सात विषयांचा समावेश होतो. १) व्यापार प्रवेश २) कृषी प्रवेश ३) अन्न, वस्त्र व कपडे यांचा व्यापार ४) व्यापाराशी संबंधीत बौध्दीक स्वामित्वाचे अधिकार. ५) व्यापाराशी संबंधीत गुंतवणुकीचे उपाय ६) सेवांचा व्यापार आणि ७) 'गॅट' च्या नियमांचे पालन होते किंवा नाही हे पाहण्या करिता व तंटे निवारण करण्या करिता बहुविध व्यापार संघटनेची स्थापना करणे.

डंकेल प्रस्ताव भारताने स्वीकारावा किंवा नाही. या विषयी भारतात दोन मतप्रवाह आहेत. भारताच्या संदर्भात डंकेल प्रस्तावाची चर्चा प्रामुख्याने शेतीतील संशोधन, उत्पादन व व्यापार आणि औषधी क्षेत्रातील संशोधन, उत्पादन व गैरेशी संबंधित आहे. डंकेल प्रस्ताव भारताने स्विकारण्यास या सर्व बाबीवर विपरित परिणाम होतील. म्हणून हा प्रस्ताव स्वीकारू नये. असे सांगणारा एक वर्ग आहे. या वर्गाचे प्रतिनिधित्व महेंद्रसिंग टिकैत यांच्याकडे जाते. प्रस्ताव स्विकारण्यात शेतीचे अर्थसहाय्य बंद होवून शेती उत्पादन घटू शकते. शेतीमालाचा व्यापार खुला झाल्यास शेतकऱ्यावर त्यांचा अनिष्ठ परिणाम होऊ शकतात. याउलट शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी डंकेल प्रस्तावाचे स्वागत करतात. त्यांच्या मते, डंकेल प्रस्तावामुळे जागतिक शेती मालाचा बाजार भारतीय शेतकऱ्यात खुला होऊन त्यांच्या मालाला चांगली किंमत मिळेल, युरोप जपान सारख्या राष्ट्राप्रमाणे आपल्या देशात शेतकऱ्याला अर्थसहाय्य जास्त नसून ते फार कमी आहे. हे काढून टाकल्याने. शेतकऱ्यांच्या उत्पादन परिणामात फारशी वाढ होणार नाही, उलट त्यांच्या मालाला योग्य किंमत मिळेल.

परिषदेच्या चर्चासत्रात देखिल या दोन बाजुंचा पुरस्कार करणारे वक्ते होते. डंकेल प्रस्ताव हिताचा नाही म्हणून स्विकारू नये हे सांगणाऱ्या वक्त्यांची संख्या अर्थात जास्त होती. डंकेल प्रस्तावात मुक्त बाजार प्रवेशाची असलेली तरतुद विकसीत राष्ट्रांनी मुद्दाम केली आहे त्यांना भारताचा मोठा बाजार काबीज करावयाचा आहे. येथील जीवप्राणी विविधतेचा विकसीत राष्ट्रांना फायदा घ्याव याचा आहे. डंकेल प्रस्तावामुळे विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावर येथे येवून भारतीय अर्थव्यवस्थेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करतील शेतीमालाच्या किंमती वाढतील, भारताजवळ शेतीमालाचे अतिरिक्त साठे नसल्यामुळे जागतिक बाजार खुला होऊन देखिल त्याचा फायदा मिळणार नाही. शेतीचे अनुदान काढून घेतल्यास, शेतीमालाचा



उत्पादन परिव्यय वाढेल. डंकेल प्रस्ताव सेवा क्षेत्राला लागू होणार असल्यामुळे भारतातील सेवा पुरविणाऱ्या संख्या पुरविणाऱ्या विदेशी सेवा संस्थाबरोबर स्पर्धा करू शकतील असे नाही. पर्यायाने हे फार मोठे क्षेत्र परकियांच्या ताब्यात जाण्याचा धोका आहे. डंकेल प्रस्ताव स्विका -रल्यास भारत कर्ज सापळ्यात अधिक अडकला जाईल. तसेच भारताची आयात वाढेल औषधा करिता डंकेल प्रस्ताव अनुकुल होणार नाही. यामुळे भारतात औषधांच्या किंमती भरमसाठ वाढतील आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढीव किंम -तीचा फायदा भारताला जास्त दिवस मिळणार नाही. कारण किंमत पातळी तीच राहिल याची शाश्वती नाही. अशी विरोधकांची मते होतात.

डंकेल प्रस्ताव भारताने सही करून तो स्विकारावा हे प्रतिपादन करणाऱ्याची संख्या फार कमी असली तरी, त्यातून वक्त्यांनी काही चांगले मुद्दे मांडले. प्रस्तावामुळे भारताला स्पर्धात्मक शक्ती वाढविण्याची संधी लाभली आहे. ही संधी भारताने वाया जावू नये, भारतात शेती औषधे या क्षेत्रात आतापर्यंत झालेली प्रगती प्रामुख्याने इतर देशातील संशोधन वापरुन झाली. व त्यातून उत्पादन वाढविता आले खुल्या व्यापार धोरणामुळे स्पर्धेला आता तोंड द्यावे लागणार आहे. आणि याकडे प्रगती करिता संधी म्हणून पहावे अशा रितीने डंकेल प्रस्तावाचे समर्थन करण्यात येते.

गेल्या ३०,३५ वर्षात जगाचा एकंदर आयात निर्यात व्यापार प्रचंड वाढला आहे. परंतु भारताचा त्यामधील वाटा एकेकाळी एक टक्का होता. आणि कालांतराने तो कमी होवून सध्या फक्त ०.६ टक्के आहे. भारताने अनेक राष्ट्राशी व्यापार प्रस्थापित केला आहे. जगाच्या व्यापारात भारताचा वाटा नगण्य असला तरी या बाबी भारताच्या विदेशी व्यापाराच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. डंकेल प्रस्तावावर १५ डिसेंबर १९९३ पर्यंत सही केली नाही तर भारताचे गॅट च्या इतर सहयोगी राष्ट्राशी व्यापार प्रस्थापित केला आहे. जगाच्या व्यापारात भारताचा वाटा नगण्य असला तरी या बाबी भारताच्या विदेशी व्यापाराच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. डंकेल प्रस्तावावर १५ डिसेंबर १९९३ पर्यंत सही केली नाही तर भारताचे 'गॅट' च्या इतर सहयोगी राष्ट्राशी व्यापार संपुष्टात येईल तरी पंतप्रधानांनी या करारावर रागातच सही केली आहे. डंकेल प्रस्तावाचे परिणाम दिसण्याकरिता काही काळ लागेल परंतू प्रस्ताव न स्विकारल्यास व्यापारात एकदम घट होऊन आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या ताळेबंदातील तुट 'सुपर ३०१' कलम भारताच्या व्यापारास लावण्याची शक्यता 'सुपर ३०१' मुळे भारताला बरेच नुकसान सोसावे लागले होते. हे सर्व टाळण्यासाठी भारताला बरेच नुकसान सोसावे लागले होते हे सर्व टाळण्यासाठी भारताला डंकेल प्रस्ताव स्विकारल्याशिवाय पर्याय नाही.

❖ ❖ ❖ ❖

## जीवनातील आशा

झालो पुढच्या जन्मी गीत,
तर कोकिळ कंठाने गाशील का ?
झालो पुढच्या जन्मी पाणी,
तर नेत्रांवाटे वाहशील का ?
झालो पुढच्या जन्मी हवा,
तर श्वासावाटे घेशील का ?
झालो पुढच्या जन्मी वारा,
तर पिवून तृप्त होशील का ?

झालो पुढच्या जन्मी राजा,
तर राणी माझी होशील का ?
ह्या जन्माची उरलेली साथ,
तर पुढच्या जन्मी देशील का ?

कु. सीमा चव्हाण
(बी.ए. भाग २)

❖ ❖ ❖ ❖

# साक्षरता स्त्रीयांसाठी समानतेचे तत्व

कु. जयश्री थोरात (बी.ए. भाग-२)

''साक्षर स्त्री समर्थ स्त्री घडवेल भारत सुसंस्कृत ''

या पंक्तीत कितीतरी मोठा अर्थ आहे. या पंक्ती कितपत सत्य आहेत. असे जर कोणी विचारले तर त्याचे उत्तर लोकारार्थीच द्यावे लागेल नाही का ? परंतु भारताला जर संपन्नतेच्या शिखरावर पोहचायचे असेल तर खरोखरच आज स्त्री साक्षरतेची नितांत गरज आहे.

''यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवत:' अशा शब्दांनी स्त्रीला गौरवून वेगडी सौदर्याने नटलेल्या मखरात तिला बंदिस्त करणारा पुरुषवर्ग आजही आहेच. घर-संसार, चूल आणि मुल, एवढेच-स्त्रीचे कार्यक्षेत्र असे म्हणुन स्त्रीला संस्कृती रुढी परंपराच्या बेड्यांनी जखडून ठेवले.

आपले महानग्रंथ रामायण, महाभारत यात काय आठवते तर स्त्रीची अवहेलनाच 'सीता त्यागानंतर रामाला सीतेबरोबर जाता आले नसते का? पण त्यावेळी ही त्याला राजधर्म, प्रजा आठवली परंतु राम वनवासाला जाताना सीतेने रामाला चौदा वर्षांसाठी एकटे का सोडले नाही.? त्या पतिव्रता सीतेचे दु:ख राम ही जाणू शकला नाही. सर्व राज्य गेल्यावर स्वत:च्या पत्नीला पणाला लावताना धर्माने द्रौपदीचा विचार केला का ? त्याने स्त्री ही सजीव परंतु भावना नसणारी मूर्तीच समजली असली पाहिजे. त्या सत्य प्रेमी धर्माला द्रौपदीच्या भावना कळल्या नाहीतर तोच वारसा पुढे चालविणाऱ्या आजच्या कलियुगातील पुरुष जातीला काय कळणार ?

स्त्री ही केवळ स्त्री नसते नव्या व जुन्या विचारांचा समन्वय साधून ती संस्कृती जतन करते. अश्रु पुसून हास्य फुलविणारी कार्यकर्ती असते. लहान मुलांशी जवळीक साधून त्यांना घडविणारी ज्ञानोपासक ध्येयवादी शिक्षिका असते. ती कोणाची माता, कोणाची पत्नी असते. ज्या प्रमाणे इंद्रधनुष्यावर अनेक रंग असतात.

त्याच प्रमाणे संसाराच्या क्षितिजावर विविध भूमिकांचे इंद्रधनुष्य विलसत ठेवण्याची अदभूत शक्ती असणाऱ्या या विश्वप्रतिमेस मानवाचा तिसरा डोळा असणाऱ्या ज्ञानाची दारे उघडी का नसावीत. ?

ज्या अखंड भूतकाळाने संस्कृतीने स्त्रीवर आजपर्यंत अन्यायच केला त्या भूतकाळाला आजच्या वर्तमान काळाने जाळून टाकले पाहिजे आणि साक्षरतेच्या शस्त्राने पुरुषातील राक्षसी वृत्ती नष्ट केली पाहिजे. तेव्हाच स्त्री समानतेचे गौरीशंकर गाठू शकेल. त्यासाठी स्त्रीने नव्या आशेने संघर्ष केला पाहिजे. यश हे मिळेलच पण त्याची गुरुकिल्ली साक्षरता स्त्रीकडे असायला हवी.

आपला देश खऱ्या अर्थाने संपन्न व्हायला हवा असेल तर प्रथम स्त्रीने साक्षरतेची मशाल उंचावली पाहिजे. व त्यानंतरच आपणास देश विकासासाठीचा संजीवनी मंत्र सापडू शकेल.

आज ज्या देशात स्त्री साक्षर आहे. तेथे संपन्नता सुसंस्कृती आहेच कारण स्त्रीचं विश्वाची प्रतिमा आहे. तेव्हा स्त्रीला समानता मिळेल तेव्हाच देशाची प्रगती होईल. असे म्हटले तर ते अर्थहीन असणार नाही.

❖ ❖ ❖ ❖





# प्लेग ! प्लेग !! प्लेग !!!

कु. निलम साळुंखे (बी.ए. भाग-३)

आजचे युग हे यांत्रिकी युग मानले जाते. त्याचप्रमाणे हे वैद्यकीय युग ही आहे. विज्ञानाने नवनवीन तंत्रज्ञानाने अनेक रोगांवर मात केली आहे. वेगवेगळ्या रोगांवर वेगवेगळी औषधे उपलब्ध केली. त्यामुळे असे रोग काळाच्या ओघात निघून गेले. परंतु तेच रोग जर पुन्हा उद्भवले तर आपल्या मनाची काय अवस्था होईल ? याचा विचार करत बसण्यापेक्षा परिस्थितीशी सामना करावा लागतो. 'देवी' 'कुष्ठरोग' 'महारोग' असे अनेक असाध्य रोग जर आपण बरे करु शकतो तर पडद्याआड गेलेला परंतु पुन्हा परत आलेला असा 'प्लेग' का बरा होऊ शकणार नाही ? असे प्रश्न मनात येतात.

'प्लेग' हा मनुष्य जातीला मुळीच नवा नाही उंदीर मरुन पडलेला दिसला तर स्थलांतर करावे असे भागवत पुराणात म्हटले आहे प्लेग हा मूळचा लॅटीन शब्द प्लेग म्हणजे आरिष्ट. आपत्ती हजारोंच्या संख्येने बळी घेणारा रोग म्हणजे 'प्लेग'.

प्लेगचा प्रथम फटका १८९४ मध्ये पुणे-मुंबईकरांना मिळाला. म्हणजेच १०० वर्षांपूर्वी या प्लेगची लागण झाली होती. त्यानंतर १८९६ मध्ये मुंबईत झालेल्या प्लेगची लागण युरोपपर्यंत पोहोचली. त्यावेळी मुंबई बंदरात एकही जहाज नांगरु न देण्याचा आदेश काढला. १९६६ नंतर प्लेगचा समूळ नायनाट झाल्याचा दावा केला परंतु हा दावा सिमल्याच्या प्लेगने (१९८३) खोटा ठरवला.

प्लेगच्या या इतिहासानंतर आता पुन्हा एकदा हा भयानक रोग उपटला गेला. परंतु सध्याचा म्हणजे सप्टेंबर १९९४ चा प्लेग हा आटोक्यात येण्यासारखा होता.

प्लेग म्हणजे तरी काय ? प्लेग हा संसर्गजन्य रोग आहे. प्लेगचा प्रसार रोगग्रस्त उंदरांपासून होतो. उंदरांच्या अंगावर असणाऱ्या पिसवा याचे विषाणू पसरवतात. उंदीर व माणूस यांच्या रक्ताची उष्णता सारखीच असते. त्यामुळे उंदीर जर मेला तर त्याचे रक्त थंड होते. त्यावर पोसणाऱ्या पिसवा या माणसांच्या अंगावर बसतात. त्यामुळे पिसवा माणसांना चावतात आणि त्यामुळे रक्त दुषित होऊन काखेत व जांघेत गाठ येते. आता उत्तमोत्तम अँटीबायोटीक्स उपलब्ध असल्याने रोग बरा होतो किटक नाशकामुळे पिसवांचा नायनाट करता येतो. उंदरांचाही बंदोबस्त करता येतो.

**प्लेगचे कारण –**

यार्सिनिया पेस्टिस किंवा पाश्च्यूरिला पेस्टिस या नावाच्या जंतूमुळे प्लेगची लागण होते.

**प्लेग कसा होतो ?**

प्लेग हा उंदराचा रोग आहे. रोगी उंदराच्या अंगावरील पिसवामुळे प्लेग माणसांपर्यंत पोहचतो. प्लेग ग्रस्त उंदराला सोडून उरलेले उंदीर निघून जातात. रोगी उंदीर मेल्यानंतर त्याच्या अंगावरील पिसवा दुसऱ्या

उंदरांच्या शोधात असतात. जर उंदीर मिळाला नाही तर या पिसवा माणसांना चावतात उंदरावर पोसलेल्या जाणाऱ्या पिसवा 'प्लेग' चे विषाणू पसरतात. त्यामुळे हा रोग माणसांना होतो. जंतू शरीरात गेल्यापासून रोग बाहेर पडायला ३ ते ६ दिवसांचा कालावधी लागतो.

लेगचे प्रकार – १) गाठीचा प्लेग (ब्युबोनिक प्लेग) २) न्युमोनिक प्लेग ३) विषजन्य प्लेग.

### प्लेगची लक्षणे –

**१) ब्युबोनिक प्लेग –**

हा प्लेग पिसवांमुळे पसरतो. मानेत, काखेत, जांघेत गाठी येतात. त्या सुजतात. दुखतात. या गाठीत प्लेगचे जंतू आढळतात. काही पशूतही असतात. पण श्वासाद्वारे याचा संसर्ग होत नाही. याला गाठीचा प्लेगही म्हणतात

**२) न्युमोनिक प्लेग–**

याचे रोगजंतू फुफ्फुसात जातात. त्यामुळे कफ निर्माण होतो. तसेच श्वासात, थुंकीतही याचे जंतू आढळतात. श्वासाद्वारे रोग पसरतो. न्युमोनिक प्लेगाचे मुख्य लक्षण म्हणजे न्युमोनिया निर्माण करणारा प्लेग. यात ताप येतो. त्यामुळे या रोगाचा प्रादुर्भाव लगेच निर्माण होतो. हा गंभीर स्वरूप धारण करतो.

**३) विषजन्य प्लेग–**

याला सेप्टिसिमिक प्लेग असेही म्हणतात. या प्लेगचे रोगजंतू रकात मिसळतात. संपूर्ण शरीरात पसरल्यामुळे त्वचेखाली रक्तस्राव होऊन रोगी मरतो.

### प्लेगवरील उपाय–

प्लेग हा लवकर पसरतो. योग्य वेळेत यावर उपाय केल्यास हा रोग पूर्णपणे बरा होतो. पूर्वी अँटीबायोटिक्सचा शोध लागला नव्हता. हजारो लोक मृत्युमुखी पडत होते. परंतु हल्ली अँटीबायोटिक्सचा अधिक वापर केला जातो. ज्यामुळे प्लेगचे जंतू समूळ नष्ट होतात.

ब्युबोनिक प्लेग हा सल्फा औषधे घेतल्यास बरा होऊ शकतो. सल्फाचे सार्डेड इंजेक्ट टाकल्यास टेट्रासायक्लीनच्या गोळ्या उपयोगी पडतात.

न्युमोनिक प्लेगमध्ये टेट्रासायक्लीन, स्ट्रेप्टोमायसीन क्लोरॅम्फे-निकॉल या अँटीबायोटीक्सचा उपयोग केला जातो. मात्र न्युमोनिक प्लेगच्या संपर्कात आलेले डॉक्टर्स, मित्र, नातेवाईक इ. नी जंतुनाशक औषधांचा वापर करावा.

### प्रतिबंधक उपाय–

प्लेगवर उपाय आहे. प्लेगची लागण झालेल्या व्यक्तीने जर त्यावर तातडीने उपाय केले तर हा रोग बरा होऊ शकतो. या रोगावर प्रतिबंधक उपाय आहेत. ते पुढीलप्रमाणे–

१) हाफकिनची प्रतिबंधक लस टोचून घेणे.
२) साथ आल्यास पेशंटला आयसोलेशन हॉस्पिटल मध्ये नेणे. तसेच साथीचे गाव सोडून जाणे गाव मोकळे करणे.
३) उंदरांचा बंदोबस्त करणे अन्न पाणी उघडे न टाकणे. मांजर पाळणे. पिंजऱ्यात उंदीर पकडून त्यांचा नायनाट करणे. उंदरांना विष घालणे अगर उंदरांच्या बिळात विषारी धूर सोडणे.
४) पिसवांचा नायनाट करणे स्वच्छता राखणे.
५) गटारात, गल्लीत, बिळात, घरात डी. डी. टी. ची पावडर फवारणे.

गेल्या कित्येक वर्षात प्लेगची साथ भारतात उद्‌भवली नाही. प्लेगवर नियंत्रण ठेवण्यात बऱ्याच प्रमाणात यश आले आहे.

मराठवाड्यात गेल्या वर्षी झालेल्या भूकंपामुळे निसर्गाचे संतुलन बिघडून प्लेगची साथ उद्‌भवल्याचा तज्ञांचा अंदाज आहे. १९०२ मध्ये प्लेगची साथ ही मोठ्या प्रमाणावर आली होती.

### गेल्या वर्षीचा भूकंप कारणीभूत–

गेल्या मराठवाडा व लातूर जिल्ह्यात भूकंपाचे जोरदार तडाखे बसले होते. या भूकंपामुळे पर्यावरणाची वित्त हानी बऱ्याच मोठ्या प्रमाणात झाली होती. त्यामुळेच प्लेगची साथ फैला आहे. पर्यावरणाचे संतुलन बिघडल्याने रानटी उंदीर लोकवस्तीत स्थलांतर करतात. या उंदरांमध्ये प्लेगचे जंतू असतात. या उंदरामुळे प्लेगचा संसर्ग होतो.

हाँगकाँगच्या साथीच्या आधी (१८९४) च्या आधी या रोगाचे नावही प्रचारात नव्हते. यर्सीन आणि शिबासाबुरो किनासाटो या दोन शास्त्रज्ञांनी सर्वप्रथम प्लेगच्या जीवाणुंचा शोध लावला. 'प्लेग' हा जरी आता भयंकर किंवा गंभीर स्वरूपाचा वाटत असला तरी सुध्दा तो आटोक्यात येऊ शकतो. रोगाची लक्षणे लक्षात येताच त्यावर तात्काळ उपाय केले जातात.

प्लेगवर बऱ्याच प्रमाणात नियंत्रण ठेवण्यात आले आहे. मात्र जोपर्यंत रानटी उंदीर व घुशी आहेत तोपर्यंत प्लेगचे जंतू राहतील आणि त्यामुळे लहान-मोठ्या प्रमाणात प्लेगची साथ उद्‌भवू शकेल. प्लेग हा आटोक्यात येऊ शकतो. प्लेगवर टेट्रासायक्लीनच्या गोळ्या व हाफकिन प्रतिबंधक लस लागू पडते.

महाविनाशकारी प्लेग पसरु नये म्हणून बरेच प्रयत्न केले गेले. ८ लाख टेट्रासा-यक्लीनच्या गोळ्या आणि टी. एन. पी. चे सल्फरचे ४५ लाख डोस वाटण्यात आले. वेळीच उपाय योजना केल्याने प्लेग आटोक्यात आला. प्लेग रोखण्यासाठी महाराष्ट्र व गुजरातलगतचे उपाय योजना राबविण्यात आल्या आणि त्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांना यश प्राप्त झाले आहे.

परंतु सरकारने प्लेगचे उच्चाटन झाल्याचा दावा केला तरीही मुंबईसह महाराष्ट्रात प्रतिबंधक उपाय योजना करण्यासाठी सरकारने आटोकाटी कठोर पावले उचलावयास हवीत. त्यासाठी इच्छा शक्ती प्रकट असावी लागते. प्लेग परत उद्‌भवणार नाही हे कशावरून सांगता येईल ? त्यासाठी प्लेगचा समूळ नायनाट व्हावा या करीता सरकारने जनतेच्या चार हिताच्या गोष्टी केल्या तर ते योग्य होईल !

❖ ❖ ❖ ❖



## येरे येरे पैसा

आपल्या आयुष्यात,
पैशांचा पाऊस नक्की पडेल.
पण केव्हा?
थोडीशी बचत नियमितपणे

केल्यावर पैशांचे ढग जमतील,
अन् मग नुसता वर्षाव....
तेंव्हा उजळेल आपले आयुष्य
समृध्दिच्या तेजाने.

कु. हौसाबाई घोरपडे (बी.ए. भाग ३)

## तू का उदास आहेस ?

फुललेला हा धुंद निसर्ग बघ कसा बहरला आहे
उमललेल्या फुलांमध्ये गंध सुगंधी भरला आहे
अशा या गंधीत वेळी तू का उदास आहे ?

निर्मळ पाणी झऱ्यातील मंजुळ पाणी गात आहे.
निर्मळ तुझ्या सौंदर्याला सुरात दाद देत आहे.
अशा या संगीत वेळी तू का उदास आहे ?

सूर्य अस्ताला जाताना संध्या मस्त फुलली आहे.
क्षितीश तुझ्या गालाचे रंग चोरत आहे.
अशा या रंगीत वेळी तू का उदास आहे ?

कु. शारदा जाधव (बी.ए. भाग ३)

## निरागस मैत्री

या नि:शब्द शांततेत मैत्रिणींसाठी
मी माझ्या कविता चिंब
भिजवून टाकल्या आहेत कारण तिथं

सगळाच खुल्लम खुल्ला व्यवहार होता
नजरेत कोणताच धोका नव्हता भिती नव्हती
जवळ घेवून काळजात कट्यार खुपसणारी

निर्दय अशी रीत नव्हती
बाजारू रीत नव्हती
वाटा भिन्न होत्या तरी साऱ्या एकच होत्या

चेहरे भिन्न होते तरी जाणीवा एकच होत्या
शरीरं वेगळी वाटली तरी
मने एकच होती. म्हणूनच

प्रत्येक पत्रांमध्ये 'मैत्री
चिरायु होवो' अशी
लिहिण्याची रीत होती.

कु. योजना पाटील
(बी.ए. भाग ३)

❖ ❖ ❖ ❖



# समाज व लोकसंख्या शिक्षण

कु. राजश्री वारटक्के (बी.ए. भाग-३)

सध्याच्या आधुनिक जीवनात मानवाच्या जीवनाचे अनेक स्तर निर्माण झाले आहेत. धकाधकीच्या व धडपडीच्या जीवनात सर्वांना शिक्षण घेणे शक्य नसले तरी ज्यांचे शिक्षण थांबत नाही, अशा व्यक्तींचे जीवन सुसंस्कृत होते यासाठी ""Learning is the today of civilised life" असे म्हटले आहे. शिक्षण हे विकासाचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. यामुळे प्रत्येकाला जीवनाचा सांस्कृतिक वारसा प्राप्त होतो. व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षण शक्ती पुरविते. यामुळे व्यक्ती विकासाच्या दिशा शोधू शकते. त्याद्वारे व्यक्तीच्या व्यक्तिगत जीवनाला बहर येतो त्यातून चांगल्या, विकासमय व शक्तीशाली समाजाची निर्मिती होते.

भारतात सध्या अनेक समस्येबरोबर लोकसंख्या ही समस्या समाजाला भेडसावित आहे. लोकसंख्या वाढ हे व्यक्तीला तसेच राष्ट्राला एक आव्हान आहे. याला पायबंद घातला तरच व्यक्तीची, राष्ट्राची प्रगती होऊ शकते. पृथ्वीच्या उगमापासून १६ व्या शतकापर्यंत लोकसंख्या वाढत होती. १६५० मध्ये जगाची लोकसंख्या सुमारे ५० कोटी होती तर १८५० मध्ये ती शंभर कोटी झाली. १९३० ते १९६० मध्ये ती शंभर कोटीने वाढली. आज ५०० कोटीपर्यंत जगाची लोकसंख्या असून फक्त भारताची ८४ कोटी आहे. गेल्या ४०-४२ वर्षात अनेक पंचवार्षिक योजना राबवल्या व देशाची प्रगती झाली. शिक्षण, आरोग्य, उद्योगधंदे, अन्नधान्याची वाढ, धरणे, कालवे, वीजनिर्मिती, खनिजे यात वाढ झाली. या सुविधा अपुऱ्या पडत आहे याचे कारण एकच लोकसंख्येचा विस्फोट! व्यक्तीची, समाजाची, राष्ट्राची सर्वांगिण प्रगती साधावयाची असेल तर लोकसंख्या शिक्षणाशिवाय गत्यंतरच नाही.

माल्थस हा लोकसंख्याशास्त्राचा जनक याने सन १७९८ मध्ये ""As eassy on the principle of population" हा पहिला निबंध लिहिला. यास जगाने विशेष महत्त्व दिले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन मानून लोकसंख्येच्या प्रमाणाचा व रचनेचा सम्यक विचार करुन उत्तम जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यक तो सामाजिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी लोकसंख्या शिक्षणाची संकल्पना आली. मनुष्याची गुणवत्ता वाढवून कौशल्याने वापर करणे, नैसर्गिक, प्राकृतिक साधन संपत्तीत वाढ, संवर्धन व संरक्षण करणे, रुढी, अंधश्रध्दा घालवणे, शेती क्षेत्रात वाढ, विकास साधणे, औद्योगिक क्षेत्रात विकास करणे, पर्यावरण समतोल राखणे, प्रदुषणावर उपाय योजणे इ. बाबींवर लक्ष केंद्रित केले तरच लोकसंख्येची संकल्पना स्पष्ट होईल.

लोकसंख्या शिक्षण म्हणजे शाळेमध्ये कुटुंबनियोजनाचा प्रसार करणे नव्हे तर विद्यार्थ्यांना लोकसंख्येची जाणीव करुन त्याचे दुष्परिणाम समजावून देवून जीवन उंचावण्यासाठी हातभार लावणे होय. लोकसंख्या शिक्षण ही एक अशी शैक्षणिक प्रक्रिया आहे, जी जीवनस्तर ठरविण्यास जबाबदार घटक व त्यांचा परस्पर संबंध स्पष्ट करते. थोडक्यात, लोकसंख्या वाढीचा या पर्यावरणावर, साधनसंपत्तीवर काय परिणाम होतो, त्याची तीव्रता ओळखणे, मानवी प्रगतीच्या उन्नतीला पोषक ठरणारी उपाय योजना आखून जबाबदारीने कौशल्यपूर्ण कार्यवाहित आणणे या सर्वांचा सर्वांगिण विचार करणे म्हणजे लोकसंख्या शिक्षण होय. हे सर्व लोकसंख्या शिक्षणातूनच शक्य होणार आहे. म्हणूनच लोकसंख्या शिक्षण हे व्यक्ती, समाज, राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे

लोकसंख्या वाढीला आळा घालण्या-साठी खालील उपाय योजावेत. समाजात लोकसंख्या शिक्षणाची जाणीव जागृती करणे, कुटुंब नियोजन, शैक्षणिक कार्यक्रम राबवणे, स्त्री शिक्षणाचा प्रसार, प्रचार करणे, विवाहाचे वय वाढविणे, साधन संपत्तीत वाढ करणे, राष्ट्रीय कर्तव्य म्हणून कुटुंब नियोजन कार्यक्रमात सहभागी होणे, यामुळे लोकसंख्या शिक्षणाचा प्रसार होईल.

**लोकसंख्या शिक्षणाची सद्य स्थिती :**

१९७० पासून शालेय स्तरावर 'लोकसंख्या शिक्षण' अभ्यासक्रमात समाविष्ट केला. तो स्वतंत्र विषय नसला तरी इतर विषयातील संबंधित पाठातून लोकसंख्या शिक्षण मिळते. यातून लोकसंख्येची वाढ, गतिमानता, कारणे, समस्या, आरोग्य, पर्यावरण हे विषय आहेत. शिक्षण शास्त्र महाविद्यालयातून हा ऐच्छिक विषय म्हणूनच सुरु आहे. देशातील सर्व सामान्य जनता सुखी व समृध्द व्हावी यासाठी लोकसंख्या शिक्षण हे एक आव्हान आहे आपण ते स्विकारुच हे निश्चित!

❖ ❖ ❖ ❖

## राणी

एक होती राणी फार फार गुणी दिसायला होती सुंदर
गाल होते लाल गुलाबी डोळे होते टपोरे
नाक होते चाफेकळी ओठ होते पंकळी
केस जसे सुकेशनी असे होते रुप तिचे
ड्रेस होता मोत्याचा बूट होते काचेचे
गात होती गोड गाणी ती होती राजाची राणी

कु. प्रतिभा शिंदे
(बी.ए. भाग १)

## जगाची रीत

क्षितिज संपत नाही वारा थांबत नाही
भावना ओथंबल्यावर तर अश्रुही थांबत नाहीत
फूल कोमजले तर फूलपाखरु थांबत नाही
उजेड असला तर दिवाही थांबत नाही
प्रत्येक गोष्टीला काही सीमा असतात
जगण्याच्या सीमा ओलांडल्या तर
कोणीच जगात थांबत नाही.

कु. किशोरी घाडगे (बी.ए. भाग १)

## झुंज

संपणार नाही वनवास रडगाण्याने
थांबणार नाही अन्याय निराशेने
हो सज्ज झुंजाया नारी नव्या साहसाने
झुंज दे निकराने समतेच्या शस्त्राने
केला तुझा अपमान ज्या अभद्र मुतकाळाने
हो सज्ज झुंजाया नारी नव्या साहसाने
संपणार नाहीत व्यथा अश्रु ढाळण्याने विश्वतारिणि
तोड त्या बेड्या जखडले तुला ज्या गुलामीने
हो सज्ज झुंजाया नारी नव्या साहसाने
केले बंदिवान तुला ज्या हिंस्त्र पशुने
कर प्रतिकार त्याला नव्या उमेदीने
हो सज्ज झुंजाया नारी नव्या साहसाने
पेटून उठ आता नव्या आशेने
'नारी मुक्ती' या स्वातंत्र्य भावनेने
हो सज्ज झुंजाया नारी नव्या साहसाने

कु. जयश्री थोरात
(बी.ए. भाग २)

## "लक्ष्मीबाई पाटील : त्यागी व्यक्तीमत्व



कु. स्वाती भोसले (बी.ए. भाग-१)

॥ 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ॥

हा भगवद्गीतेचा संदेश आचरणात आणणाऱ्या अनेक व्यक्ती आपल्या भारतात होऊन गेल्या. त्यापैकीच कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई पाटील ह्या होय.

ज्याप्रमाणे रंगभूमीवर काम करणाऱ्या नटांचे व त्यांच्या कार्याचे मूल्यमापन आपण करू शकतो, पण पडद्यामागे राहून दिग्दर्शन करणाऱ्या सुत्रधाराकडे आपली नजर जात नाही. त्याचप्रमाणे भाऊरावांच्या कार्याचे मूल्यमापन करताना त्यांच्या मागे छायेप्रमाणे राहून कार्य करणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई त्यांच्याकडे आपली नजर जात नाही. ज्योत दुसऱ्याला प्रकाश देते पण त्यासाठी तेजाने आपले जीवन संपवलेले असते. त्याचप्रमाणे सौ. वहिनींनीही कर्मवीरांच्या कार्यासाठी असेच आपले जीवन वाहून घेतले.

कर्मवीरांची ही संस्था कर्मवीरांच्या असामान्य कर्तृत्वामधून जशी निर्माण झाली आहे; त्याचप्रमाणे त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई उर्फ वहिनी या पतिव्रता साध्वीचा त्यागही त्याला कारण आहे. पण हा त्याग भाऊरावांच्या हिमालयाएवढा उत्तुंग, भव्य-दिव्य अशा व्यक्तित्वापुढे झाकून गेला आहे. म्हणूनच अल्प सामान्य जनांना सौ. लक्ष्मीबाईच्या व्यक्तिमत्वाची व असीम त्यागाची माहिती असणे आवश्यक आहे. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते त्याचप्रमाणे कर्मवीरांच्या सहवासाने वहिनींच्या जीवनाचे सोने झाले.

एखादी कळी अर्धवट उमलून आपल्या सुगंधाने सर्व वातावरण प्रसन्न करते आणि कोमेजून जाते. सौ. लक्ष्मीबाईचे जीवनही असेच होते. स्त्रीचे जीवन म्हणजे पतीच्या चरणाच्या भक्तीभावाने व श्रध्देने समर्पित केलेले कमलपुष्प असते. पतीचे सौख्य हेच ती आपले सौख्य मानते. पतीच्या जीवनाची अर्धी बाजू सावरण्याची पवित्र शपथ ती सप्तपिढीच्या मंगलसमयी अग्नी नारायणास साक्ष ठेवून घेते. म्हणूनच तिला 'अर्धांगी' म्हटले जाते. ही अर्धांगीनीची बाजू सौ. लक्ष्मीबाईंनी आयुष्यभर सांभाळलीच पण त्याकरिता त्यांनी आयुष्यातील सर्व सुखांना खुशीने तिलांजली दिली.

सुस्वभाव हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्त्वाचा पैलू म्हणता येईल. ज्यावेळी भाऊराव पाटील किर्लोस्कर कारखान्यात नोकरीस होते त्यावेळी लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी सौ. लक्ष्मीबाईबद्दल असे प्रशंसनीय उद्गार काढले होते की, 'गृहलक्ष्मी असावी तर लक्ष्मीबाई पाटील यांच्यासारखीच असावी'. त्यांनी स्वत:च्या वसतिगृहातील मुलांच्यात कधीही भेदभाव पाळला नाही. मधल्या सुट्टीच्या वेळी एखादा वसतिगृहातील मुलगा खिन्न होऊन झाडाखाली बसे त्यावेळी त्यांच्या हृदयात कालवाकालव होई. मग त्या हळूच घरात असेल तो खाऊ त्याला देत व फक्त तुलाच हा खाऊ, दुसऱ्याला सांगू नकोस असे सांगत. अशाप्रकारे सौ. लक्ष्मीबाईंनी भाऊरावांच्या प्रत्येक कार्यात छाया बनून साथ दिली. त्यांचे स्वत:चे असे वेगळे व्यक्तिमत्वच नव्हते. कारण ते



त्यांनी भाऊरावांच्या विशाल व्यक्तिमत्वात विलीन करुन टाकले होते. त्यातच त्यांचे साफल्य होते.

सौ. लक्ष्मीबाईंनी भाऊरावांच्या कार्यासाठी आपल्याजवळचे सुमारे १० तोळ्यांचे दागिने खर्ची घातले व त्या लंकेच्या पार्वती बनल्या. सन १९२८ च्या मकरसंक्रातीच्या दिवशी स्वत:चे मंगळसूत्र गहाण ठेवून वसतिगृहातील मुलांना जेवू घातले. त्या स्वत: भाऊरावांच्या कठीण, आदर्श आणि प्रयोगाच्या आगीतून तापून सोने बनलेल्या होत्या. म्हणूनच त्यांना सौभाग्य अलंकारापेक्षा वसतिगृहातील मुलांचे जीवन महत्त्वाचे वाटते. १९३० च्या गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी स्वत:चा मृत्यू समोर दिसत असतानासुध्दा सौ. वहिनींना वसतिगृहातील मुलांची चिंता लागली होती. त्यांना लाडवाचे जेवण मिळावे अशी त्यांनी व्यवस्था केली होती. या सर्व गोष्टी अतिशय महान, श्रेष्ठ आणि धन्य होत्या.

'भारतीय अबलांचे बलतेज अद्यापि या भारतभूमीत तृप्त नाही' असे सावरकरांनी म्हटले आहे.

समाजातील दीन, दलित पतितांच्य -ामध्ये परिवर्तन होण्यासाठी भाऊरावांच्या प्रमाणे सौ. लक्ष्मीबाईनीही आपले तन, मन, धन सर्वस्वी अर्पण केले. तेही कोणतीही वैयक्तिक अपेक्षा न बाळगता. म्हणून कवी कुसुमाग्रजांच्या शब्दात म्हणावेसे वाटते

"नकोच नसली जरी प्रकट स्मारकांची दळे।
असंख्य हृदय उभी सतत आपुली देऊळे॥"

❖ ❖ ❖ ❖

### का ?

प्रीत नव्हती करायची
मन तू गुंतवलेस का ?
जाण तुला नसताना
आन तू घेतलीस का ?
खेळ नव्हता खेळायचा
डाव तू मांडलास का ?
मिलन नव्हते घडणार
विरह तू दिलास का ?
संसार नव्हता मांडायचा
विध्वंस तू केलास का ?

कु. योगिता वागडोळे
(बी.ए. भाग ३)

### ओळखा पाहू माझे नांव

माझे नाव कमळात नाही पण पुस्तकात आहे
ओळखा पाहू माझे नाव ?
माझे नाव चमेलीत नाही पण शेवंतीत आहे
ओळखा पाहू माझे नाव ?
माझे नाव शहरात नाही पण गावात आहे
ओळखा पाहू माझे नाव ?
माझे नाव पारड्यात नाही पण वजनात आहे
ओळखा पाहू माझे नाव ?
माझे नाव दिल्लीत नाही पण कलकत्त्यात आहे
ओळखा पाहू माझे नाव ?
माझे नाव उजाड माळावर नाही पण रमणीय ठिकाणी आहे
ओळखा पाहू माझे नाव ?
अहो कशाला डोक्याला ताप देता
जरा पहा नीट मिळेल तुम्हांला उत्तर.

कु. रंजना पुसेगावकर
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖



# एक पावसाळी संध्याकाळ

कु. उषा गायकवाड (बी.ए. भाग-१)

ऊन काय मस्त पडलंय टॉप हं! ऊन पहाव तर असं! नाहीतर रोज पडतंय आपलं लूत भरल्यासारख. बाकी आज सगळंच टॉप. मघाशी पाऊस पडून गेला तो टॉप होता. रस्त्यावरुन तो ढब्या धाडकन कोसळला ते ही टॉप. आज एकटीच फिरायला जायची आयडिया आली. टॉप आयडिया! माणसानं कसं एकटंच असाव.... आराम, कुणाची वटवट ऐकून घेणे नको, कुणाची सोबत नको. एकट असल की कशा टॉप कल्पना सुचतात. हलक हलक वाटत पंख फुटायला लागतात हे उनच कस गोंजारत आहेस वाटत तो पांढरा रंग आमच्या मनीचाच रंग आणि हे निळ आकाश, येस ती बेटी याच रंगाची साडी नेसून येते टॉप गंमत आहे नाही? निळं आकाश, पांढरे ढग, पिवळ ऊन, लाल भडक अशी ही गुलमोहराची फुल. टॉपच हं! रंग आणि ब्रश आणायला हवा होता बेफामपैकी चित्र काढल असतं.

समोरची पोरगी टॉप आहे हं. पोरगी असावी तर अशी. चालते काय नाईस. हवेत तरंगल्यासारखी पण छे! इकडे तिकडे किती बघायच. काही मॅनर्स? शोभत नाही असल हे बायकांच्या जातीला. कसं शालीन असावं, वागण्यात नि बोलण्यात. ही अरे हसते की माझ्याकडे पाहून हा काय चावटपणा व्हॉट ए नाईस लुक? येस, पण माझ्याकडेच पहाते ना माझ्याकडे? येस आपणही हसाव का हिंदी हिरोसारखं? छे: शी, काय घाण कल्पना सभ्यतेला शोभते का हे? तू उद्याची जबाबदार नागरिका आहेस. तू स्त्रीचा मान राखायला हवास पण गेली कुठं ती पोरगी? शी हॅज गॉन अवे. जाने दो.

थंड वारा सुटलाय स्वेटर घालायला हवा होता. गोली मार दो उस स्वेटर को! थंड वाऱ्याला घाबरायच? हा वारा हुंगायला हवा किती टॉप वाटतय वाऱ्यावर असच उडावं आणि... हे काय? इतक खेटून चालायचं! असतील हो नवरा बायको. पण म्हणून काय झालं? रस्त्यात आजूबाजूला माणस असतात म्हटलं शूऽ शूऽ किती घाबरली. दोघ वीतभर अंतर राखून चालायला लागली माग वळून काय बघता? बघा बघा पाठी एवढे डोळे करून बघा मी मुळीच बघणार नाही असला फाजील पणा रस्त्यावर बिलकूल चालू देणार नाही. इथूनच वळत आहात माघारी छे चुकलंच माज शूऽ शूऽ करायला नको होत हळूच माग जाऊन फक्त मजा पहायची होती उगीच त्रास दिला बिचाऱ्यांना प्रेम घरात केल काय रस्त्यावर केल काय बिघडल कुठं? चुकलंच

हा बंगला काय टॉप आहे अस हव रहायला ठिकाण अशा ठिकाणी भराभर कविता सुचतील नाव काय बंगल्याचं? डि आय एम पी एल ई डिंपल म्हणजे खळी गालावरची खळी गालावरचीच! मग कुठली खळगी तिथलीच गालावरचीच प्र व्हाट अ वाईस नेम बहोत खूब नाव असाव तर अस डिंपल! कुणाच्या गालावरची खळी पाहिली बरं? कुणाच्या तरी पाहिली खरं

इथंच थांबावं पुढं कुठं जायचं घरात आई वाट पहात असेल लवकर पोचायला हवं नाहीतर आयडिया हं अजून किती वाट शिल्लक आहे? येताना कशी मोजत आली पुढे कोण चाललय? मघाचाच जोडप! वंडर! इतक्र वेळ कुठं होते ते? आणखी मजा करावी का? नक्को नो

आले एकदाची घराजवळ दारात कोण उभं आहे? सुरेखा! ह्यावेळी आमच्या घरी काय काम काढलय बेटीनं? नाहीतरी भलतीच आगाऊ स्पष्ट सांगायला हव तिला....छे काहीतरीच काय! उगाच एखाद्याचा व्देष करायचा बिचारी येत आहे तर येऊ दे तशी काही एकदम वाईट नाही ती...

❖ ❖ ❖ ❖

## विरह

तुझ्या आसवांचा दीप पेटला
पतंग दिलाचा जळून गेला।
सुवर्ण सणांचा गालीचा विणला
एकेक धागा तुटून गेला।
तुझ्या प्रितीचा गुलाब फुलला
सुगंध त्याचा विरुन गेला।
तुझ्या हास्याचा झरा वाहिला
प्रवाह त्याचा आटून गेला।
तुझ्या भेटीचा वारा सुटला
मार्ग त्याचा थटून गेला।
तुझ्या सुखाचा वृक्ष मोहरला
कण कण त्याचा गळून गेला।
तुझ्या विरहाचा कळस झाला
पंछी मनाचा झुरुन गेला।

कु. मनिषा देसाई (बी.ए. भाग २)

❖ ❖ ❖ ❖

## त्रिवेणी

जोडुनी दोन्ही माझ्या या कराला,
साष्टांग वंदिते मी या महाविद्यालयाला.
थोरा मोठ्यांचे आशिर्वाद लाभले.
महाविद्यालय येथे उदयास आले.
कृष्णा, तारळी, मांड येथे त्रिवेणी संगम,
महिला महाविद्यालयाचा झाला येथे उगम.
याने घडविले विद्यार्थिनींवर चांगले संस्कार,
उच्च शिक्षणाची सोय करुन केले हे उपकार.
अनुभवी प्राध्यापक वर्गाने आणला याला आकार,
उज्वल निकालाची परंपरा लाभली अपार.
विद्यार्थीनींचे गुण यातून जागे झाले,
'त्रिवेणी' चे हे दुसरे फुल उदयास आले.

कु. मंदाकिनी मदने
(बी.ए. भाग ३)

❖ ❖ ❖ ❖

## आत्मविश्वास

त्याचे अस्तित्व असताना मन असते आल्हादपूर्ण
मात्र तो नसला तर सारेच वाटते कसे अपूर्ण
असेल जर त्याची साथ वाटते जग जिंकावे सारे
यशोदेवतेच्या मंदिरात नाम कोरावे सुवर्णाक्षरे

तो मनात असेल तर सारेच कसे डौलदार व्यक्तिमत्त्व
घडविणारा तोच माझा शिल्पकार इतका जिवलग इतका
खरा कोण असावा असा खास माझ्या मनी विलसणारा
हा तर माझा आत्मविश्वास.

कु. राजश्री माने
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖



# लोकशाही आणि लोकशिक्षण

कु. मंजुषा पाटील (बी.ए. भाग-१)

"काय गोपाळराव ! मत देण्याला नाही गेलात ?" एका सदगृहस्थाने दुसऱ्या सदगृहस्थाला प्रश्न विचारला "नाही गेलो ! असा काय फरक पडणार होता ; माझ्या मताने रांगेत उभे रहाण्यापेक्षा चक्क ताणून दिली."

दोन शेजाऱ्यांचे संभाषण चालले होते. ते शेजारी झोपडपट्टीत रहाणारे कुठल्यातरी कारखान्यात काम करणारे होते. नारायण सारखाच सखारामाला सांगत होता. "अमक्याने आम्हाला दहा, रूपये दिले; मग मारला त्याच्या चित्रावर शिक्का" सखाराम नारायणला त्यावर कडी करीत सांगतो. "त्या तमक्याने तर चक्क एक-एक बाटली दिली.

ही दोन्ही संभाषणे ऐकली आणि मनात आले की आजही लोकशिक्षणाची नितांत गरज आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात आपल्या नेत्यांनी लोकजागृती आणि लोकशिक्षणाचे काम केले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, आगरकर आणि इतर अनेक नेत्यांनी वृत्त-पत्रातून सतत लेखन करून स्वराज्य, स्वातंत्र्य, स्वदेश याची जनमानसात भावना जागी ठेवली त्याचेच मूर्त फळ म्हणूनच आपण स्वतंत्र झालो. आणि आपल्या देशात लोकशाही राज्य निर्माण झाले.

लोकशाही म्हणजे 'लोकांनी लोकांच्यासाठी चालवलेले लोकांचे राज्य' भारतासारख्या विशाल देशात आम्ही लोकशाही राज्य पध्दती राबवतो याचा आम्हाला मोठा अभिमान आहे. पण खरोखर आमच्या जनतेला लोकशाही उमगलेली आहे का ? तर दुःखद वेळा खेदाने म्हणावे लागेल, 'नाही' म्हणूनच आजही लोकशिक्षणाची आवश्यकता आहे. लोकशाहीत लोकांच्याद्वारे राज्यकारभार चालतो. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत कारभार चालतो. त्यासाठी मताचे सामर्थ्य फार मोठे आहे. हे प्रत्येक उमेदवाराला समजले पाहिजे तेवढेच मतदानाला महत्व आहे. मतदाराने आपल्या मताविषयी जागृत असले पाहीजे. कोणत्या व्यक्तीला आपला प्रतिनिधी म्हणून निवडावे याचा त्याने डोळसपणे विचार केला पाहीजे नाहीतर ती लोकशाही खरी लोकशाही न ठरता, फक्त दिखाऊ लोकशाही राहील. अशा वेळी लोकशाहीच्या बुरख्याखाली हुकुमशाही निर्माण होईल. लोकशाही राज्यातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या हक्काची पूर्ण जाणीव असेल तरच ते आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवू शकतात. लोकशाहीत स्वत:च्या हक्काबरोबर प्रत्येक व्यक्तीला कर्तव्य हवे, तो कर्तव्याचे ! त्यासाठी ही लोकशिक्षणाची मोठी आवश्यकता आहे. 'हे राष्ट्र माझे आहे, देशाचा उत्कर्ष हे माझे आहे. ते मी जपले पाहिजे तिच्या विषयी मला अभिमान असला पाहिजे नाहीतर शुल्लक कारणासाठी आम्ही 'संप' करतो व कोट्यावधी रुपयांचे उत्पादन थांबवितो. पदोपदी 'बंद'चा पुकारा घेतो. त्या निमित्ताने आमच्या सार्वजनिक वस्तुंची जाळपोळ होते. स्वदेशीचा अभिमान न बाळगता चोरट्या आयातीचे ग्राहक बनून त्याला उत्तेजन दिले जाते. आजही लोकशिक्षणाची आवश्यकता आहे असे वाटते.

❖ ❖ ❖ ❖





# वृक्षवल्ली आम्हां सोयरी

कु. शकुंतला सुतार (बी.ए. भाग-१)

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या पंक्तीत तुकारामांनी सांगितल्याप्रमाणे वृक्ष हे मानवाशी अतिशय जवळचा संबंध आहे हेच दर्शवितात. मानवी जीवनात निसर्गाला अव्दितीय स्थान आहे. वृक्षांच महत्व वर्णन करताना सुभाषितकार म्हणतात.

"छायामन्यस्य कुर्वन्ति तिष्ठन्ति स्वयमातपे । फलन्तिच परर्थाय वृक्षा: कलपद्रुमा: इव ॥"

प्रत्येक सणाला त्या त्या देवीदेवतांचे विशेष महत्व असते. देवदेवता म्हंटल्या की त्यांची यथासांग पूजा; आणि पूजा म्हंटल की पानंफुलं आलीच: पाडव्याला कडुनिंब तर दसऱ्याला आपट्याची पानंच हवीत हे जरी आपल्याला माहीत असले तरीही त्या दिवशी फक्त याच झाडांना महत्व आहे.

आपल्या जीवनात वनस्पतींना अनन्यसाधारण महत्व आहे. अन्न, वस्त्र, निवारा या आपल्या गरजा भागविण्यात वनस्पतीचा मोठा सहभाग आहेच. पण पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या हवा, पाणी, सुर्यप्रकाश या बरोबरच वनस्पतीचा ही अंतर्भाव करावा लागेल, म्हणूनच उद्यानांना शहराची फुफ्फुसे म्हटले आहे. वनस्पतीपासून आपणास पूर्ण अन्न तर मिळतेच पण आपण ज्यांचा मांसाहारात समावेश करतो असे प्राणीही या वनस्पतीवरच जगणारे असतात. कापूस, ताग यापासून वस्त्र विणण्यासाठी धागा मिळतो. जंगलातील लाकूड हे आपणास इंधन म्हणून बांधकाम, शेतीची अवजारे तयार करण्यास उपयोगी पडते. त्याचबरोबर जंगलातून आपणास तसेच जनावरांसाठी घर शाकारण्यासाठी गवत मिळते विविध फुले, बिया, झाडांच्या साली, मध, डिंक, काही औषधे, बिडीसारख्या उद्योगासाठी झाडाची पाने मिळतात. घराची बांधकामे. रेल्वे स्लीपर्स, फर्निचर, बोटीबांधणे आणि सेनादलाची कामे या सर्वांना लाकूड जंगलातून उपलब्ध होते. आशाप्रकारे जंगलाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेत मोठा वाटा असतो.

१ ऑगस्ट हा 'वृक्षारोपण दिन' म्हणून पाळण्यात येतो. सर्वत्र एक आठवडाभर वृक्षारोपण करण्याची धांदल उडते. वृक्ष मोठ्या उत्साहात लावले जातात, पुढे त्याचे काय होते ? त्यातील किती वाढतात ? हे पाहिले जात नाही. त्याची निगा राखली जात नाही.

आजच्या विसाव्या शतकापुढील सर्वात मोठे प्रश्न चिन्ह म्हणजे 'प्रदुषण' हे होय. अनेक विषारी वायूमुळे हवा दूषित होते, हवेतील प्राणवायूचे प्रमाण घटत आहे, आणि हे असेच चालू राहिले तर पृथ्वीवरील मानवजातीची अवस्था फार बिकट होईल. म्हणून प्रदुषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी वृक्षारोपणाची अत्यंत आवश्यकता आहे. वृक्ष आपल्या आरोग्यास अपायकारक असणाऱ्या वायूंचे शोषण करतात. कार्बनडाय ऑक्साईड हा वायू आत घेतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल कायम राखला जातो.

वाढते शहरीकरण, महानगरे, औद्योगिकरणाच्या विकासामुळे प्रदुषण वाढते आहे ते टाळण्यासाठी वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या हरितक्रांती, वनमहोत्सव इ. उपक्रमांना सहकार्य करणे आवश्यक आहे.

# आजची स्त्री

कु. योगिता निकम (बी.ए. भाग-१)



सध्याचे युग हे खरतर स्त्रीच्या दृष्टीने घातक म्हणावे लागेल. पूर्वी स्त्रीला मानाचे स्थान असायचं याचं रुपांतर म्हणजे स्त्री म्हणजे एक वेल आहे. आणि तो वेल वृक्षाविना जगू शकत नाही. तिचा खरा आधार म्हणजे बालपणी पित्याचा, तरुणपणी पतीचा व वृध्दावस्थेत पुत्राचा. खरं पाहिले तर सर्व अधिकार पुरुषालाच दिले आहेत आणि लोकांचा समज आहे की स्त्री ही अबला आहे. हे तिच्या मनात भरविले आहे. ती कोणत्याही गोष्टीचा निर्णय पतीविना घेत नाही. तर मग स्त्रीला देवत्व कुणी दिले. तिला मढवून देव्हाऱ्यात कोंडले गेले. स्त्रीचे कार्यक्षेत्र म्हणजे स्वयंपाक घर, फार झालं तर माजघर त्यामुळेच चूल आणि मुल एवढ्याच मर्यादित तिला वावरता येत असे. अशा या अंध आणि पुरुषप्रधान समाजाला स्त्री ही एक माणूसच आहे ही गोष्ट मुळात विसरली आहे. आजच्या युगात स्त्रीला मनाचे धक्के बसतात. कारण हा समाज पुरुषप्रधान आहे. परंतु स्त्रीच्या बाबतीत उलट घडते. तिला अन्यायाला झगडावे लागते आणि त्यात अपयश आले तर शेवटी आत्मदहन याशिवाय पर्याय नाही.

स्त्री पराक्रमाची, धैर्याची आपल्या कर्तृत्वाची परंपरा सतत वाढत आहे. आपल्या कर्तृत्वाने कळसावर थोरवी वाढविणाऱ्या स्त्रीया सध्या फार थोड्या आहेत. उदाहरणे घेतली तर त्यामध्ये राणी लक्ष्मीबाई, जिजाबाई, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी अशी कितीतरी शौर्यवान स्त्रीयांची नावे घेता येतील.

परंतु आजच्या स्त्रीने आपल्या भोवतालचे बंधनाचे जाळे तोडून काढले आहे. वर्षानुवर्षे बंद केलेल्या तारा तिने जगाला दाखवून दिले आहे कि मी आजच्या जगात अबला नाही तर सबला आहे. तिने समाजाला दाखवून दिले आहे कि मी सुध्दा पुरुषाइतकेच तडफडतेने सामाजिक, आर्थिक, वैचारिक, राजकीय निर्णय घेऊ शकते. खरं पाहिले तर आजच्या समाजाने स्त्रीचे हे ब्रीद वाक्य मान्य केले आहे. स्त्रीचे हे कर्तृत्व आज समाजाला मान्य आहे. महात्माजींना स्त्री वर्गात खऱ्या अर्थाने सामर्थ्य दिसून आले आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात स्त्री आपणाला काम करताना दिसत आहे. आजची स्त्री कशी आहे ? तर तिने समाजाला जखडून धरले आहे. आणि प्रत्येक कार्यात तिने आपले सामर्थ्य सिध्द करुन दाखविले आहे.

आजच्या युगात स्त्रीला मानाचे स्थान दिले गेले पाहिजे. अशी जिद्द तिने निर्माण केली आहे. तिने आता संचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य मिळविले आहे. स्त्री मुक्तीच्या नावाखाली मंगळसूत्राची बेडी तिने तोडली आहे. कुंकू तिलकाचे बंधन झुगारले आहे. मातृत्वाचे ओझे तिला असाह्य झाले आहे. पुरुषानेही मला मदत दिली पाहिजे, तसे चूल आणि मुल ही माझी एकटीची जबाबदारी नाही हे तिने ठामपणे सांगितले आहे. सध्याची स्त्री स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ शकते. स्वत:ची आवड - निवड ती ठरवू शकते. स्वत:चे कार्यक्षेत्र ती निवडू शकते.

आजच्या स्त्री - पुरुषाने अगोदर एकमेकाकडे आदराने पाहिले पाहिजे, सौजन्याची वागणूक दिली पाहिजे, स्त्री हा सर्वात जास्त मत्सर स्त्रीचाच करते आहे असे म्हटले आहे. परंतु खरे पाहिले तर सासूने सूनेला जिवंत जाळण्याचे प्रकार घडतात. हेच ते सांगतात की स्त्रीच स्त्रीवर अन्याय करते. मुलगी व सून यात तिने फरक करु नये. मग सर्व गुंताच नाहीसा होईल व सुनेचा आदर झाल्यास ती सासू - सासऱ्यांना आदराने वागवेल. यात तिळमात्र शंका नाही. आणि तिला वैवाहिक जीवनात कोणत्याच गोष्टीची उणीव भासणार नाही.



# कविता

## शुभेच्छा !

पूर्ण होवोत सर्व इच्छा हिच नववर्षाची शुभेच्छा
सुखात सरावे वर्ष दु:खाचा नुरावा स्पर्श

समृध्दीत होवो वृध्दी मिळावी शांती बुध्दि
प्रगतीला लाभो गती विसरुनी अधोगती

होते नवगत वर्षाचा मेळ शब्द सुमनाचा हा खेळ !

कु. संध्या पाटील
(बी.ए. भाग ३)

❖ ❖ ❖ ❖

## जाणशिल का ?

जेंव्हा आतुरलेले डोळे पाणावलेले असतात
येऊन हळूच तु पुसशील का ?
जेंव्हा दुखावलेले मन माझे वंचित असते
येऊन हळूच फुंकर घालशिल का ?
जेंव्हा मन माझे बोलावत असते

तेंव्हा समोरुन येशील का ?
जेंव्हा मन माझं दर्दभरी गाणं गुणगणतं
त्याला तू साथ देशील का ?
या वेड्या जीवाची इवलीशी ओढ
क्षणभर तरी थांबवशील का ?

कु. योगिता पाटील
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## जीवन

एक रेलचेल आहे जीवन ज्यामध्ये सुख - दु:खाची गर्दी
क्षणभर सुखाची साऊली
तर कायमचे दु:खाचे ऊन आहे ॥१॥

जीवन एक रहस्य आहे ज्याला उमगेल त्याचे
ज्याला न उमगेल त्याचे
जीवन अर्थहीन आहे ॥२॥

जीवन एक स्पर्धा आहे हारजितांचे मैदान आहे
जो जिंकतो तो जगतो
जो हारतो तोहि जगतो ॥३॥

परंतु मनामध्ये एक ध्येय बाळगुन जर ध्येय
करायचे असेल पूर्ण तर समजावून घ्या
जीवनाचा अर्थ ॥४॥

कु. चंद्रभागा खरात
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## स्वप्नगंध

माझे शब्द उधळत आले वाणीतून प्रत्यक्ष सांगु कशी ?
माझ्या सुरांना साथ मिळाली झंकारित मी छेडू कशी ?
भावफुलांच्या गंधानी उधळलेली फुले मी झेलु कशी ?
अपार माझे मन आले उचंबळून त्याला आता मी सावरु कशी

कृष्ण, कान्हाच्या मैफलिने जीवन सरितेला
आळवू कशी ? प्राजक्ताच्या पराग गंधांनी
स्वप्नवेलीला फुलवू कशी ?

आरती त्याची करावी मंत्रमुक्त होवू कशी ?
आसवे ज्याची कळाली वाट आता पाहू किती ?

कु. अर्चना कुलकर्णी
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## पाखरा

जा - जा रे पाखरा जाऊन ये जा जरा
सांगून माझ्या आईला डोळे लागले वाटेला
मन झाले हुरहुर कानी येई कुरकुर
चाहूल येई तुझी भेट झाली वाटेत माझी
आनंदाने येई रडू झाले का रे माझे हसू
आली आली माझी आई तिच्या सोबत माझी ताई

कु. जाधव शुभांगी दत्तात्रय पाल

❖ ❖ ❖ ❖

## पाहिजेत

आळ्वावरील पाणी साठविण्यासाठी शिस्तीचे
स्टोअरकीपर पाहिजेत
डोंगर - शिखरांना रंगविणारे प्राविण्य प्राप्त रंगारी पाहिजेत.
ढेकणांना प्रयोजन शिकविणारे अनुभवी डॉक्टर पाहिजेत
मृगजळावर घर बांधणारे
आधुनिक इंजिनिअर्स पाहिजेत
चंद्रावर प्रेमधडे देणारे ज्ञानी शिक्षक पाहिजेत
दवबिंदूची वेणी गुंफणारे
निवडक फुलारी पाहिजेत
नवदी संस्थांचे शोध घेणारे आजचे शास्त्रज्ञ पाहिजेत
जाहिरात करण्यासाठी
अंगप्रदर्शक सुंदरी पाहिजेत
पात्र उमेदवारांच्या मुलाखतीसाठी आंतरराष्ट्रीय
व्यापारी पाहिजेत आणि
संस्थानिकांचे गोडवे गाणारे सुस्वर कंठाचे गायक पाहिजेत.

कु. गौरी मोकाशी
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## "रस्ते"

सुर्य उगवताच वाहू लागतात रस्ते
महापूरातल्या नदीसारखे
दाट झाडीतून चालावे तसे हे चाल क्षणभर थांबावे
डोळे भरुन आकाश न्याहाळाव पर्वत, नदी, नाले,
देवळाची शिखरे भरुन घ्यावे डोळ्यात
पण आकाश कवेत येतच नाही...
रस्ताही थांबत नाही....
मित्रा तू तरी थांब पुढच्या वळणावर
कारण एकदा गर्दीत हरवलो की
सर्वच चेहरे अनोळखी होऊन जातात
सूर्य कलतीला गेला की ओसरु लागतील
या वाहणाऱ्या नद्या अंधार झाला की
आपण भेटू कोणत्यातरी
अनोळखी वळणावर....

कु सुतार एस्. आर.
(बी. ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## प्रेमाखातर

विचार करतो प्रेमाखातर तुला कशाची भेट द्यावी
निळ्या नभाची साडी घ्यावी मग हातांनी पदर धरावा
चांदण्याचा गोफ रेशमी मखमल वाणी मोर भरावा
आनंदाचे तुझे उनाळे दंहोशीची भरती घ्यावी
रेशीमस्पर्शी हातावरती मऊमुलायम मेंदी ल्यावी
धुंद शरावी ओठांसाठी क्षितिजावरची लाली गुलाबी
संध्यासमयी थोडी घ्यावी नाजूक हस्ती ओठी भरावी
मोरपिसांसम गालांसाठी एक पाकळी भेटी अंती
गुलाबाकडूनि मागुन घ्यावी गुलाब गाली फुलल्यावरती
गुलाबास त्या परत करावी....

कु. माने सुनिता शामराव
( बी. ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖



## साक्षरता गीत

आवड मला शिकायची वर्गाला जाऊ दे
वर्गाला जाऊनी शहाणं होऊ दे
शेजारची ही सखू मजला लागली बोलवायला
अहो लागली बोलवायला
चला चला ग जाऊया आपण जाऊया शिकायला ॥ धृ ॥

अज्ञानाने केली कमाल
अंधश्रध्देने केली धमाल
अंधश्रध्दा घालविण्यासाठी आपण लागू या
कामाला आता लागूया कामाला
चला चला ग जाऊ या आपण ..... ॥ १ ॥

येईल जेव्हा बाराखडी
तुटेल दारिद्रयाची बेडी
निरक्षरतेवर मात करुन आपण साक्षर
होऊया, आता साक्षर होऊया
चला चला ग जाऊया आपण ..... ॥ २ ॥

शिक्षणाची थोरवी महान
जगात शिकणाऱ्याला मान
शिक्षणाचे महत्त्व आता लागले कळायला
आता लागले कळायला
चला चला ग जाऊया आपण ..... ॥ ३ ॥

निरक्षरतेचा फायदा घेऊन
सावकार चढलेत डोक्यावर
साक्षर जनता भूषण भारता हा नाद
घुमवूया, हा नाद घुमवूया
चला चला ग जाऊया आपण ..... ॥ ४ ॥

कु. उषा रतन गायकवाड
(बी. ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## हुंडा

घडा घडा, मागणी हुंड्याची फडाफडा फडाफडा
जीव कापे बापाचा मुलगी जळते आहे
कुणाची ? माझी का तुझी ?
साऱ्या समाजाची समाज झोपला आहे
जाग आणण्याची जबाबदारी कोणाची ?
माझी का तुझी ?
साऱ्या समाजाची चला, उठा करा निर्धार
ना आम्ही हुंडा घेणार ! ना आम्ही हुंडा देणार !
दुष्ट हुंडा प्रथा आम्ही मोडणार
जेव्हा स्त्रीच, स्त्रीची शत्रू होते आणखी
एक स्त्री हुंडाबळी होते द्या स्कुटर,
द्या मोटर कशाला ही टुरटुर ?
असाल खरे नरवर तर स्वत: मिळवाल घर
मुलगी झाली म्हणून कपाळावर नका मारु हात
तर हुंडा मागणाऱ्याच्या कमरेत मारा लाथ !

कु. जाधव वर्षा व्यंकटराव
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## माझे बाबा

माझे बाबा कधी न कळले
कधी न उमगले सर्वांहूनही न्यारे ॥ १ ॥
माझे बाबा सोन्याहून मौल्यवान
कुबेराच्या धनाहूनही श्रेष्ठ ॥ २ ॥
माझे बाबा माणुसकी, प्रेम ज्यांच्यात
ओतप्रोत, देवाहूनही देव ॥ ३ ॥
माझे बाबा देवाच्या स्मरणाची काय गरज
घरातच माझ्या देव ॥ ४ ॥
माझे बाबा करुन त्यांची सेवा
मिळे देवाचे समाधान ॥ ५ ॥

कु. चंद्रभागा खरात (बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## व्यंग चित्र

तुझे रुप पाहता चंद्र ढगा आड झाला
तुझे वजन करता तराजू ओशाळला

तुझे माप घेता लागे दिड टेप
जया म्हणती लांबी तेची आडमाप

कु. योजना पाटील
बी.ए. भाग ३

❖ ❖ ❖ ❖

## "सार्थक"

उठतात तरंग तुझ्या आठवणींचे हृदयी
येतात मेघ दाटून मनी तुझ्या अबोल प्रीतीचे

तुझा 'नकार' नी होकार करी द्विधावस्था मनाची
केंव्हा समजणार तू चलबिचल माझ्या हृदयाची

तुला वजा केल्यावर जीवनच निरर्थक आहे
पूर्ण होवो न होवो अभिलाषा ही मनाची

समजावीन वेड्या मनाला कारण त्यागातच आहे
सार्थकता खऱ्या प्रेमाची.

कु. शकुंतला सुतार
(बी.ए. भाग १)

❖ ❖ ❖ ❖

## वात्रटिका

- ❑ एका तरुणाने आजन्म अविवाहित राहण्याची ... घेतली. अन एक बिचारी जन्मभर कुमारिका राहि...
- ❑ एकदा त्याच्या हाती आला होता तिचा पदर ... पहातो तो होती स्वत:चीच चादर
- ❑ कधी काटे तर कधी फुल हा जीवनाचा रस्ता ... लोकशाहीचा खून पाडून चालणारा मात्र सुर्जी ...
- ❑ संसारात पसरला आर्थिक तिमिर शोधू लागला ... शिबीर
- ❑ शेअरच्या दलालांनी आर्थिक व्यवस्था खिळखिळी ... सत्तेच्या दलालांनी लोकशाही खिळखिळी केली.

कु. योगिता पा...
(बी.ए. भा...

## वात्रटिका

१) पोलिस

चाळीस चोर, एकच पोलिस भाराभार काम, आहे ... भरीस थोडेसे खटकले, जरासे चुकले जनतेच्या ... दरबारी, आम्ही ओलीस.

२) जुगार

दर महिन्याला घरी येत नाही पगार कारण याच्या ... लागला आहे जुगार

३) खिसे कापू

बसमधून, लोकलमधून सारख्या मारतो चकरा ... लागे घबाड हाती, तोच दिवाळी - दसरा.

४) विनयभंग

जागेपणी नेहमी तो म्हणत असे अभंग स्वप्नात ... हटकून करीत असे विनयभंग

कु. प्रतिभा ...
(बी.ए. भा...

❖ ❖ ❖ ❖







*" तुम्हारे छूने में था प्राण*
*संग में पावन गंगा स्नान;*
*तुम्हारी वाणी में कल्याणि !*
*त्रिवेणी की लहरों का गान ! "*

*– सुमित्रानंदन पंत*

# हिंदी विभाग

विभागीय संपादक - प्रा. महिपती शिवदास

# अंतरंग

## गद्य विभाग


| अ.नं. | नांव | | लेखक | पा.नं. |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. देवेश ठाकुर : व्यक्तित्व एवं कृतित्व | - | कु. संगीता कदम | २९ |
| २) | हिंदी साहित्य को स्त्रियोंकी देन | - | कु. मीना हत्ते | ३१ |
| ३) | समाचार पत्रों का महत्व | - | कु. प्रमिला जाधव | ३३ |
| ४) | सबसे बडा रुपया | - | कु. नलिनी यादव | ३५ |
| ५) | भैंस (लघुकथा) | - | कु. संगीता फासे | ३७ |


## पद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मानव | - | कु. मनिषा भोसले | ३० |
| २) | मगर | - | कु. मनिषा भोसले | ३० |
| ३) | इसलिए | - | कु. मनिषा भोसले | ३० |
| ४) | इंतजार | - | कु. संध्या मोरे | ३० |
| ५) | जिंदगी | - | कु. सीमा चव्हाण | ३२ |
| ६) | भोली | - | कु. वर्षा जाधव | ३२ |
| ७) | प्यार | - | कु. लता माने | ३४ |
| ८) | दर्द-ए-दिल | - | कु. वल्लरी शिंदे | ३४ |
| ९) | मिलन | - | कु. अर्चना ढेवळे | ३४ |


## पद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | आप की कहानी | - | कु. पार्वती मोकाशी | ३६ |
| २) | धन से क्या मिलता है | - | कु. रुबिना मुलाणी | ३६ |
| ३) | दृष्टि | - | कु. विधा सावंत | ३७ |
| ४) | शेर-शायरी | - | कु. शुभांगी पवार | ३४ |
| ५) | शेर-शायरी | - | कु. मंजुषा पाटील | ३८ |
| ६) | शेर-शायरी | - | कु. राजश्री थोरात | ३८ |
| ७) | शेर-शायरी | - | कु. योगिता वाघडोळे | ३८ |
| ८) | हँसी मजाक | - | कु. वर्षा पाटील | ३८ |
| ९) | हास्य व्यंग | - | कु. संगीता फासे | ३८ |




# डॉ. देवेश ठाकुर : व्यक्तित्व एवं कृतित्व

कु. संगीता कदम (बी.ए. भाग-३)

डॉ. देवेश ठाकुर प्रगतिशील समीक्षक और रचनाकार के रूप में हिन्दी जगत में ख्यात हैं। वे स्वतंत्र चेता लेखक हैं और किसी खेमेसे बंधे हुए नही हैं। ऐसे लब्ध प्रतिष्ठित तथा प्रगतिशील रचनाकार डॉ.देवेश ठाकुर का जन्म २३ जुलाई सन १९३३ इनके ननिहाल, उत्तर प्रदेश के अलमोडा जिले में पैठानी नामक एक छोटे गाँव में हुआ। देवेशजी को घर में 'मुन्ना' नामसे पुकारा जाता था।

वे बचपन में आरंभ के कुछ वर्षोतक अपनी माँ के साथ मामा के गाँवमें ही रहे। वहीपर बटूलिया स्कूल में इनकी शिक्षा का आरंभ हूआ और दूसरी कक्षा तक की पढ़ाई इसी स्कूल में हुई। बाद में उनकी आरंभिक शिक्षा पैठानी के साथ साथ नजीबाबाद में हूई। हायस्कूल की परीक्षा पास करने के बाद आगे की पढ़ाई करने के लिये नगीना चलें गए। दसवी कक्षा तक उन्हांने पिताजी के साथ, रानीखेत, जोशीमठ, कर्ण-प्रयाग, श्रीनगर-चाँदपूर, बिजनौर, नजीबाबाद आदि स्थानों में अपना जीवन बिताया।

उन्हें साहित्य लिखने की आदत बारहवीं कक्षा से लगी। शुरु शुरु में नाटक कविता इस विधा में साहित्य लिखा। बी.ए. और एम.ए. की शिक्षा प्राप्त करने के लिये देहरादून में डी.ए.वी कॉलेज में प्रवेश लिया। आर्थिक अभाव और जीवन संघर्ष की कटूता का अनुभव उन्होंने बचपन से ही लिया है। परिवार में ज्येष्ठ पुत्र होने के नाते पूरे परिवार की जिम्मेदारी इनके उपर आ पडी। इन्ही दिनों में इनकी अध्ययनशीलता और संघर्षशीलता बलवती होती गयी। कपडो, किताबों, फीस सभी का जुगाडा इन्हें अपने आप करना होता था। अपने जीवन में इन्होंने सभी प्रकार के काम किये।

अत्यंत सामान्य परिवार में पले-बढ़े देवेशजी का जीवन अभावों, विषमताओं और कठोर संघर्षो के बीच गुजरा। एम.ए. के पश्चात ये नजीबाबाद में आते है। यहाँपर प्राइवेट स्कुल में ४० रू माहवार पर हेडमास्टरी करते है। कुछ दिनो कें बाद अत्यंतप्रतिकूल स्थिती में बंबई में होनवाले सरकारी प्रतिरक्षा विभाग में ऑडीटरी स्वीकार करते हैं। नौकरी करते समय उनका साहीत्य-प्रेम कम नहीं हूआ। उसके पश्चात वे बी.एड. कराने के लिए नौकरी का इस्तिफा देते हैं। कुछ दिनों की प्रतीक्षा के बाद उनकी बंबई के सिडन्हम कॉलेज में नियुक्ति होती है। तीन-चार वर्षो के बाद उनका तबादला रजकोट के सौराष्ट्र कॉलेज में कर दिया जाता है। राजकोट से वापस आते ही उनको रूइया कॉलेज में लेक्चरर की नौकरी मिल जाती है। वहाँपर ही वे हिन्दी विभागध्यक्ष पद ग्रहन करते है १२ अक्तूबर १९६१ में उनके जीवन को एक नया मोड मिलता है। उनका विवाह सुशीला डंग के साथ अत्यंत सादगी के साथ संपन्न होता है। डॉ देवेश ठाकूर ने बचपन से ही अभावों, विषमताओं और संघर्षो को देखा ही नहीं, उन्हे गहराई से जिया है। उनके जीवन की अनुभव यात्रा काफी लंबी है।

उनकी लेखकीय यात्रा १९५४ में 'मयुरिका' के प्रकाशन से आरंभ हुई जो अभी तक अबाध गति से चल रही है। इस बीच उन्होंने ४० से अधिक पुस्तको का शोध, समीक्षा, उपन्यास, काव्य, कहानी, आलेख आदी

विधाओं में प्रणयन किया है। उसीबीच उन्होंने सागरविश्वविद्यालय से पी.एच.डी. औरडी.लिट कीं उपाधियाँ भी प्राप्त की।

डॉ देवेश ठाकुर अत्यंत ख्यात अध्यापक और शोध निर्देशक रहें हैं। अबतक उनके मार्गदर्शन में १० शोधार्थियों को पी.एच.डी. की उपाधि प्राप्त हो चुकी है। उनका पुरा साहित्य 'देवेश ठाकुर रचनावली' में प्रकाशित हुआ है जो इस प्रकार हैं-

उपन्यास- भ्रमभंग, प्रिय शबनम, कांचघर, इसीलिए, अपना-अपना आकाश, गुरुकुल, जनगाथा, शून्य से शिखरतक, अन्तत:

शोध- प्रसाद के नारी चरित्र, आधुनिक हिंदी साहित्य की मानवतावादी भूमिकाएँ।

समीक्षा- नयी कविता के सात अध्याय, 'नदी के द्वीप' की रचना-प्रक्रिया, मैला आँचल की रचना-प्रक्रिया। आधुनिक कहानी का विकास, साहित्य के मुल्य, साहित्य की सामाजिक अन्त-छाया, आलेख

विविध- सिर्फ संवाद (कहानी) मयुरिका, अन्तर-छाया, अवकाश के क्षणों में (काव्य) दो सहेलियाँ, ममता (बाल-साहित्य) परिवेश १, २, ३

इस प्रकार डॉ देवेश ठाकुरजी का व्यक्तित्व एवं कृतित्व निश्चित बहुमुखी है।

❖ ❖ ❖ ❖

## मानव

जो गलतियाँ करता है। और इसीलिए
'वह' मानव होता है।
मानव के जीवन में गलतियाँ न होती तो,
मानव भगवान हो जाता।

## मगर

भगवान को मानव के
दु:खों का एहसास नहीं होता।
दु:खों को प्यार करने वाला
मानव होता है।

## इसलिए

मानव को मानव बनकर रहना ही,
उसके लिए गर्व की बात है।

कु. भोसले मनिषा सदाशिव
(बी.ए.भाग-१)

❖ ❖ ❖ ❖

## इंतजार

ये दुनिया है एक इंतजार।
रात को दिन का इंतजार।
बेपारी को, ग्राहक का इंतजार।
माँ को अपने बच्चे का इंतजार।
ये दुनिया है एक इंतजार॥

गरीब को अमीर बनने का इंतजार।
प्राध्यापक को प्राचार्य बनने का इंतजार।
प्रेयसी को अपने प्रेमी का इंतजार।
ये दुनिया है एक इंतजार॥

किसान को बारिश का इंतजार।
नेता को मंत्री बनने का इंतजार।
विद्यार्थी को कॉलेज खत्म होने का इंतजार॥

हर किसी को किसी ना किसी का इंतजार
ये दुनिया है एक इंतजार॥

कु.संध्या बबनराव ...
(बी.ए भाग ...)

❖ ❖ ❖ ❖





# 'हिंदी साहित्य को स्त्रीयोंकी देन'

कु. मीना हत्ते (बी.ए. भाग-३)

स्त्रियों के विषय में जितना साहित्या लिखा गया है , उसकी तुलना में स्त्रियों व्दारा लिखे गये साहित्य का परिमाण बहूत कम है। इसका कारण स्त्री-शिक्षा का अभाव, स्त्रियों की सामाजिक दुर्दशा और अस्त-व्यस्त राजनीतिक परिस्थितियाँ कही जा सक्ती है। पुरुष पर आश्रित रहने के कारण नारी मे कुछ-न-कुछ आत्महीनता का भाव आ ही जाता है ,और जब पुरुष यह अनुभव करते है कि नारियों की रक्षा उन्हें करनी है। तो वे स्त्रियों पर मनमानी भी चलाते है। राजनीतिक उथल-पुथल के काल में उच्च शिक्षा स्त्रियों को तो दूर, पुरुषों तक को प्राप्त नहीं होती। इन सब कारणों से हिंदी साहित्य में स्त्रियों की देन उतनी नहीं है जितनी आशा की जा सक्ती थी।

भारतीय समाज में स्त्रियों को सार्वजनिक क्षेत्र में आने और प्रशंसा पाने का अवसर वैदिक काल में रहा है, किंतु मध्य काल में बिलकुल नहीं रहा। मीरा भी केवल इसीलिए ख्याति पा सकी, क्योंकि उसने अपनी भक्ती और प्रेम के आवेश में परिवार और समाज के बंधनो को तिलाजंलि दे दी थी। ऐसी दशा में यदी स्त्रियों ने कुछ उत्कृष्ट काव्य रचना की भी हो तो उसका प्रकाश में आना कठिन ही था।

हिंदी साहित्य के प्रारंभिक काल मे किसी कवयित्री की रचनाएँ प्राप्त नहीं होती। किंतु वीरजाथाकाल के बाद भक्ति काल में हमें हिंदी की सर्वश्रेष्ठ कवयित्री मीरा का साहित्य प्राप्त होता है। कृष्ण को लक्ष करके मीराने जैसी विरह की पीर और प्रेम की आतुरता से भरी हुई कविता लिखी है। अपने काल की अन्य स्त्रियों के समान मीरा भी संभवत: बहुत शिक्षित नहीं थी। उसने अपने पदोंके लिए बहुत कुछ बोल-चाल की भाषा का ही प्रयोग किया है। जैसे-

"मेरे तो गिरधर गोपाल दुसरो न कोई। जाके सिर मोर -मुकुट मेरो पति सोई।"

मीरा की भक्ति दाम्पत्य भाव की भक्ति है। वह कृष्ण को अपना पति मानती थी और उसी रूपमें उनकी उपासना करती थी।

मीरा की भाँती सहजोबाई और दयाबाई ने संत-काव्य की रचना की है। मीरा के पदों में निर्गुण ब्रम्ह की उपासना के कुछ पद पाये जाते है, परंतु मुख्यरूपसे उसकी कविता सगुण भक्ति को लेकर चली है। इसके विपरीत सहजोबाई और दयाबाई की कविता निर्गुण ब्रम्ह की उपासना की कविता है। ये दोनो महात्मा चरणदास की शिष्या थी।

रीतिकाल के अन्तर्गत आनेवाले 'आलम' की पत्नी शेख रंगरेजिन भी एक अच्छी रचनाकार थी। उन्ही दरम्यान राजस्तान में बहुत सी रानियोंने काव्य-रचना करने का काम किया। परन्तु यह काव्यरचना सामान्य कोटी की है। इन कवयित्रीयों में रसिक बिहारी, प्रतापकुंवरबाई, जुगलप्रिया, चन्द्रकलाबाई इत्यादी नाम विशेष रूप से उल्लेखनीय हैं।

इसके बाद हिंदी साहित्य का आधुनिक युग प्रारंभ होता है। भारतेंदु हरिश्चन्द्र ने स्त्री-शिक्षा के लिए जोरदार आंदोलन चलाया। उसके फलस्वरूप द्विवेदी युग में हमें साधारण कोटी की कवयित्रियों के दर्शन होते है। श्रीमती रघुवंशकुमारी, श्रीमती बुन्देलबाला, श्रीमती कीर्तिकुमारी, श्रीमती राजदेवी इत्यादी कवयित्रियों ने देश-प्रेम तथा समाज-सुधार संबंधी अनेक कविताएँ लिखी। इन कवयित्रियों में श्रीमती तोरनदेवी 'लली' की रचनाएँ अपेक्षाकृत अधिक लोकप्रिय हुई। तोरनदेवी जीकी रचनाओं में कहीं-कहीं रहस्यवादी भावना भी है।

श्रीमती महादेवी वर्माजीने हिंदी साहित्य में अपना विशेष स्थान बना लिया है। जो आदर और गौरव भक्ति काल की कवयित्रियों में मीरा को प्राप्त है, वह आधुनिक युग की कवयित्रियों में श्रीमती महादेवी वर्मा को है। महादेवी की रचनाओं में करूणा और विरह की बडी मधुर और सजल अभिव्यक्ति हुई है। उनका काव्य मुख्य रूप से पीडा का काव्य है।

महादेवी वर्मा के बाद श्रीमती सुभद्राकुमारी चौहान का नाम हिंदी कवयित्रियों में सबसे प्रमुख दिखाई पडता है। सुभद्राकुमारी ने वीरत्व और वात्सल्य की सुंदर कविताएँ हिंदी को दी है। उनकी 'झाँसीवाली रानी' और 'मेरा बचपन' कविताएँ लोकप्रिय हुई है।

आधुनिक युग में पद्य का महत्व दिनों-दिन घटता जा रहा है और गद्य का महत्व बढ रहा है। आजकल अनेक लेखिकायें कहानियाँ उपन्यास, निबंध इत्यादी लिखकर हिंदी की महत्वपुर्ण सेवा कर रहीं है। इनमें उषादेवी मिश्रा, श्रीमती शिवरानी देवी, श्रीमती कमलादेवी चौधरी, श्रीमती सोनक्सिा, मन्नू भण्डारी, कृष्णा सोबती, रजनी पन्निकर, सलमा सिद्दकी, अमृता प्रितम, आदि महिला साहित्यकार का ध्यान गद्य के बारे में महत्वपूर्ण है। कहीं-कहीं पर छुट-पुट रूपमें काव्यसाधना भी की गई। निश्चित ही निकट भविष्य में साहित्य कला-कृतियाँ प्राप्त होंगी जों न केवल स्त्री साहित्यकारों के नाम को उज्ज्वल करेंगी, बल्कि हिंदी साहित्य की बहुमूल्य संपत्ति बनकर रहेंगी।

❖ ❖ ❖ ❖

## जिंदगी

जिंदगी एक सहेली है।
जो सुख दु:ख में हमारा साथ देती है।
जिंदगी एक नाटक है।
जिसमें हमें अभिनय करना पडता है।

जिंदगी एक खेल है।
जिसके सहारे हमें जीना पडता है।
जिंदगी एक वचन है।
जिसे हमें निभाना पडता है।

कु. सीमा चव्हाण
(बी.ए.भाग-२)

## भोली

बगीचे में एक दिन घुम रहा था
अचानक वह मेरे नजरो में आयी थी
वाह ! क्या खुबसुरत थी वह
आँखो में ही नहीं मेरे दिल में समाई थी ॥

पागल बन गया तब मैं
देखकर उसकी मोहकता को
चाहता था अपने मन से
खिंचकर अपने साथ ले चलूँ ॥

ऐसे कैसे कर सकता था मैं
पास जाकर ही देख रहा था
दिखने में कितनी भोली थी
फूल बननेवाली वह नाजूक कली थी ॥

कु. वर्षा जाधव
(बी.ए.भाग १)

❖ ❖ ❖ ❖ ❖ ❖ ❖ ❖





# 'समाचार पत्रों का महत्व'

कु. प्रमिला जाधव (बी.ए. भाग-३)

